# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### फैजपूर (ता.रावेर, जि.जळगाव) परिसरात अवैध दारुविक्री व वाहतूक होत असल्याबाबत.

**(१) ६६१६४ (२४-०८-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फैजपूर (ता.रावेर,जि.जळगाव) परिसरात मोठया प्रमाणावर अवैध दारुविक्री व दारु वाहतूक होत असल्याने अनेक कुटूंबातील तरुण व्यसनाधीन होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने अवैध दारुविक्री व दारु वाहतूक रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शंभूराज देसाई (०८-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.

अवैध मद्य निर्मिती, विक्री व वाहतूकीवर वेळोवेळी कारवाई करण्यात आलेली आहे.

अवैध दारू विक्री व वाहतूक रोखण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

१) अवैध प्रकारांना आळा घालण्याच्या दृष्टीने नियंत्रण कक्ष तसेच नागरिकांकडून प्राप्त तक्रारींवर वेळोवेळी कारवाई करण्यात येते.

२) फैजपूर, ता. यावल या परिसरात सन २०२२-२३ मध्ये एकूण ९२ गुन्हे नोंदविण्यात येऊन ५३ आरोपी इसमांवर कारवाई करण्यात आली आहे. त्यामध्ये सुमारे रु.१०.१३ लाख इतक्या किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

३) माहे एप्रिल, २०२३ ते ऑगस्ट, २०२३ या कालावधीत ५७ गुन्हे नोंदविण्यात येऊन रू.११.५६ लाख इतक्या रक्कमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

४) सन २०२३-२४ मध्ये अवैध मद्याच्या व्यवसायात गुंतलेल्या ८ सराईत इसमांकडून महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ च्या नियम ९३ अन्वये चांगली वर्तणूक ठेवण्याबाबतचे बंधपत्र घेण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

५) आयुक्त,राज्य उत्पादन शुल्क कार्यालयात नियंत्रण कक्ष अहोरात्र कार्यरत असतो. जनतेला तक्रार करण्यासाठी टोल फ्री क्रमांक व व्हॉट्स ॲप क्रमांक प्रसिध्द करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील विविध न्यायालयांत दाखल असलेले दावे जलद गतीने निकाली काढण्याबाबत

**(२) ६६३८६ (२९-०८-२०२३). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.यशोमती**

**ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नारायण कुचे (बदनापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध न्यायालयांत दाखल असलेले दावे जलद गतीने निकाली काढण्यासाठी न्यायव्यवस्थेकडून विविध उपाय राबवत अनेक उपक्रमदेखील घेतले जात असतानाही देखील राज्यातील सर्व दिवाणी व फौजदारी न्यायालयात असलेल्या दाव्यांची संख्या वाढत असल्याचे मे २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या राज्यात ४९ लाख ८२ हजार ४७ दावे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणे तात्काळ निकाली काढण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दि.१ सप्टेंबर, २०२३ रोजी ५३ लाख २६ हजार ४०९ दावे प्रलंबित आहेत, हे खरे आहे.

(३) विविध न्यायालयात प्रलंबित असलेले दावे निकाली काढण्यासाठी मा.उच्च न्यायालयाकडून विशेष मोहिम व विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या राज्य न्यायालय व्यवस्थापन प्रणाली समितीने सन २०१८ ते सन २०२२ तसेच सन २०२३ मध्ये राज्यातील विविध न्यायालयांत दाखल असलेले दावे जलद गतीने निकाली काढण्याकरीता कृति आराखडा तयार केला आहे. तसेच १० ते ४० वर्ष प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली काढण्याकरीता न्यायिक अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या आहेत. न्यायालयीन प्रकरणांचा निपटारा जलद गतीने करण्याकरीता न्यायिक अधिकाऱ्यांची पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील “धामणी” प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(३) ६६४३१ (०१-०९-२०२३). श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील राधानगरी, गगनबावडा व पन्हाळा तालुक्यातील २५ गावांसाठी जीवनदायी ठरणाऱ्या “धामणी” धरणाचे काम अत्यंत धिम्या गतीने सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माती बांधक मजबुतीकरणासह आतील व बाहेरील अस्तरीकरण सुरु असून गेली अनेक वर्षे प्रलंबित असलेले घळ भरणीचे काम अद्याप सुरु झाले नसल्याने १२० कोटींचा हा प्रकल्प ७८२ कोटींवर पोहचला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन प्रकल्पाच्या कामाला गती देऊन या प्रकल्पाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०२३) :**(१) होय.
(२) होय.
वनजमिन संपादन, भूसंपादन , पुनर्वसन , सुप्रमा व न्यायालयीन बाबीमुळे प्रकल्पाचे काम पूर्ण होण्यास विलंब झाला आहे. सदर प्रकल्पाची मुळ प्रमा ही सन १९९५-९६ मधील रु. १२०.३० कोटी किंमतीची असून शासन निर्णय, जलसंपदा विभाग, दिनांक १३ ऑक्टोंबर २०१६ अन्वये सदर प्रकल्पास रु. ७८२.३७ कोटी किंमतीच्या द्वितीय सुप्रमा प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे.
(३) सदर प्रकल्पाच्या उर्वरित कामाची निविदा स्विकृत करुन दिनांक १२/०५/२०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले असून सद्यस्थितीत काम प्रगतीत आहे. जून २०२५ अखेर प्रकल्प पुर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर जिल्हयातील पवन ऊर्जा निर्मितीला चालना देण्याबाबत

**(४) ६६४३९ (२९-०८-२०२३). श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयात सर्व नैसर्गिक परिस्थिती अनुकूल असतानाही पवन ऊर्जा निर्मितीला चालना मिळालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सांगली व सातारा जिल्हयाच्या तुलनेत कोल्हापूर जिल्हयातील पवन उर्जा निर्मिती केवळ १० टक्के इतकीच आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी करुन कोल्हापूर जिल्हयातील पवन ऊर्जा निर्मितीला चालना देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२३) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
पवन ऊर्जा प्रकल्प हे मुख्यत: खाजगी गुंतवणूकदार/ विकासक यांच्यामार्फत उभारले जातात. कोल्हापूर जिल्हयातील पवन ऊर्जा निर्मितीक्षम ठिकाणी जंगलव्याप्त व डोंगराळ क्षेत्र असल्याने तसेच काही ठिकाणे जैवविविधता क्षेत्रामध्ये येत असल्याने (Eco Sensitive Zone) पवन ऊर्जा प्रकल्प उभारण्यास बंधने आहेत. याशिवाय पवन ऊर्जा प्रकल्पासाठी यंत्रसामुग्री/अवजड साहित्य वाहतुकीसाठी सातारा व सांगली जिल्हयाच्या तुलनेत आवश्यक रस्ते व निष्कासन व्यवस्था उपलब्धता नाही. त्यामुळे सातारा व सांगली जिल्हयांच्या तुलनेत कोल्हापूर जिल्हयात खाजगी गुंतवणूकदार / विकासक यांच्याकडून पवन ऊर्जा प्रकल्पाच्या उभारणीस अल्प प्रतिसाद आहे.
(३) कोल्हापूर जिल्हयामध्ये ३१ ठिकाणी पवन वारा परिमापन केंद्रे उभारण्यात आली होती. त्यापैकी ८ ठिकाणे पवन ऊर्जा निर्मितीक्षम असल्याचे आढळून आले आहे. या ठिकाणांपैकी भेंडेवडे, ता. शाहूवाडी जि. कोल्हापूर या पवन ऊर्जा निर्मितीक्षम ठिकाणी एकूण ६६.६५ मे.वॅ. क्षमतेचा पवन ऊर्जा प्रकल्प खाजगी गुंतवणूकदार / विकासक यांनी आस्थापित केला आहे. गुंतवणूकदारांना तसेच विकासकांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने दिनांक ३१ डिसेंबर, २०२० रोजी

अपारंपारिक ऊर्जा धोरण २०२० जाहीर केले असून दिनांक ३० जून, २०२२ रोजी या धोरणांतर्गत प्रोत्साहनात्मक सुधारणा जाहीर केल्या आहेत. या धोरणानुसार सन २०३० पर्यंत पवन ऊर्जा निर्मितीचे २५०० मेगावॅट इतके उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंत्रीपद मिळवून देण्याचे अमिष दाखवून वेगवेगळ्या आमदारांची कोट्यावधी रुपयांची झालेली फसवणूक**

**(५) ६६४८५ (२८-०८-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य अथवा केंद्र सरकारमध्ये मंत्रीपद मिळवून देण्याचे अमिष दाखवून वेगवेगळ्या आमदारांना कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या व्यक्तीला नागपूर पोलिसांनी मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान अटक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील संशयित आरोपीची पोलिसांनी सखोल चौकशी केली आहे काय चौकशीमध्ये काय निष्पन्न झाले, त्या अनुषंगाने सबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१२-२०२३) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
सदर प्रकरणी आमदारांना मंत्रीपदाचे आमिष दाखवुन पैशाची मागणी करण्यात आली होती. मात्र सदर आमदारांनी आरोपीस कोणतीही रक्कम दिली नसून केवळ फसवणूकीचा प्रयत्न झालेला आहे. नागपूर शहर पोलीसांनी या प्रकरणी गुजरात येथून एका आरोपीस दिनांक १८.०५.२०२३ रोजी अटक केली असून संबंधीताविरुद्ध नागपूर पोलीस आयुक्तालयांतर्गत पोलीस ठाणे, तहसील येथे गु. र. क्र. ४२३/२३, भा. दं. वि. कलम ४१९, ४२०, ५११ तसेच आय. टी. ॲक्ट सहकलम ६६(क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा अधिक तपास पोलीसांकडून सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मणेरी-गोवुळवाडी-धनगरवाडी (जि.सिंधुदुर्ग) येथील तिलारी पाटबंधारे कालव्याच्या दुरुस्तीबाबत**

**(६) ६६५१४ (०३-०९-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मणेरी-गोवुळवाडी-धनगरवाडी (जि.सिंधुदुर्ग) येथील तिलारी पाटबंधारे प्रकल्पाच्या मायनर कालवा मोठया प्रमाणात खचला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे कालव्यालगतची शेती धोक्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कालव्याच्या दुरुस्तीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
तिलारी पाटबंधारे प्रकल्पाच्या मणेरी वितरिकेवर सा.क्र. १/२५० मी. वर दिनांक ०५.०४.२०२३ रोजी वितरिकेच्या तळाशी Piping Formation होऊन कालवा फुटी झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) अंशत: खरे आहे.
मणेरी वितरिकेच्या कालवा फुटी झालेल्या ठिकाणी पडीक जमीन असल्याने शेतीचे कोणतेही नुकसान झालेले नाही.

तथापि, सदर वितरिकेचे अस्तरीकरण जांभा दगडात झाले असून भरावाच्या ठिकाणी पाझर होत असल्याने भरावाच्या लगतच्या जमिनीमध्ये दलदल सदृश्य परिस्थिती निदर्शनास येते.

(३) मणेरी वितरिकेवर सा.क्र. १/२५० मी. वर फुटलेल्या ठिकाणी दि. ०५.०४.२०२३ रोजी यांत्रिकी विभागामार्फत भराव टाकण्यात आला असून, त्याच दिवशी सिंचन आवर्तन सुरू केलेले आहे. तसेच, सदर वितरिकेच्या दुरूस्तीच्या कामाचा अंतर्भाव तिलारी प्रकल्पाच्या कालवा नूतनीकरणाच्या प्रस्तावात केलेला असून त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ९ जिल्ह्यातील १२ आदिवासी प्रकल्पांतून बिरसा मुंडा जोडरस्ते योजनेचा आराखडा तयार करण्यासाठी शासनाने सुरू केलेल्या प्रक्रीयेबाबत...**

**(७) ६६७०७ (०१-०९-२०२३). श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील यवतमाळ, नांदेड, गोंदिया, नागपूर, गडचिरोली, चंद्रपुर, भंडारा, हिंगोली व अमरावती या ९ जिल्ह्यातील १२ आदिवासी प्रकल्प कार्यालयाअंतर्गत १०० टक्के आदिवासी गावे बिरसा मुंडा जोडरस्ते योजना शासनाने राबविण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, सदरहू योजनेच्या कामास प्रत्यक्षात केव्हापासून सुरुवात करण्यात येणार आहे व या योजनेंतर्गत कोणकोणते प्रकल्प राबविण्यात येणार आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०९-१०-२०२३) :** (१) (२) व (३) राज्यातील सर्व आदिवासी वाडे/पाडे यांना बारमाही मुख्य रस्त्याशी जोडणे, आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आठमाही रस्ते बारमाही करणे आणि आदिवासी उपयोजना क्षेत्रातील जी प्राथमिक आरोग्य केंद्र/आश्रमशाळा इ. अद्याप मुख्य रस्त्याशी जोडली गेलेली नाहीत, त्यांना मुख्य रस्त्याशी जोडणे, यासाठी भगवान बिरसा मुंडा जोडरस्ते योजनेस दि.१८/०८/२०२३ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये मंजूरी देण्यात आली आहे.

सदरील योजनेस प्रशासकीय मान्यता व निधी आदिवासी विकास विभागामार्फत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर योजनेची अंमलबजावणी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येणार आहे.

तसेच, सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी विभागाच्या स्तरावर समिती गठीत करण्यात येणार असून अवर्गीकृत तसेच आठमाही ते बारमाही करण्यात येणाऱ्या रस्त्यांच्या कामांच्या बृहत आराखड्यास समितीची मान्यता घेण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रामराज-महान (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील परिसरात सांबरकुंड धरण उभारणे प्रलंबित असल्याबाबत**

**(८) ६६८९२ (०३-०९-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामराज-महान (ता.अलिबाग , जि.रायगड,) येथील परिसरात सांबरकुंड धरण निर्माण करण्याची योजना शासनाने १९६५ साली आखली असून गेले ६० वर्षाहून अधिक कालावधी झाला तरी अद्यापही सदरहू धरणाचे बांधकाम सुरु झाले नसल्याची धक्कादायक बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भविष्याची गरज लक्षात घेऊन शासनाने सदरहू धरण उभारण्याच्या कामास अंदाजित ११ कोटी रुपये खर्चास मान्यता दिली असून धरणाच्या कामास अधिक कालावधी झाला असल्याने सदरहू धरणाच्या अंदाजित खर्च ७५० कोटी रुपयांवर गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, साबरकुंड धरणाच्या रखडलेल्या कामाच्या अनुषंगाने रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजी सर्व संबंधित अधिकाऱ्यांसह एक बैठक संपन्न होऊन सदरहू बैठकीत विलंब प्रकरणी सखोल विचार विनिमय होऊन काही निर्णयही घेण्यात आले, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू धरणाचा उभारणी त्वरीत सुरु करण्याबाबत शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१२-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

प्रकल्पास शासन निर्णय क्र. एस.एस.बी. १०८२/३५७(९२/८२) जसंअ/ दि. २८/०७/१९८२ अन्वये मुळ प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

(२) होय हे खरे आहे,

सन १९८२ मध्ये रु. ११.७१ कोटी किंमतीच्या मुळ अंदाजित खर्चास शासनाने मान्यता दिली होती. तद् नंतर सन २००१ मध्ये सन २००० - ०१ च्या दरसुची नुसार रु.५०.४० कोटी किंमतीस शासनाने मान्यता प्रदान केली. तद् नंतर सन २०१८-१९ च्या दरसुची नुसार दि. २५/०६/२०२० अन्वये रु ७४२.८८ कोटी किंमती च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. प्रकल्पासाठी आवश्यक भुसंपादन खर्चामध्ये झालेली वाढ, संकल्पनातील बदल व दरसुचीमधील भाववाढीमुळे प्रकल्पाच्या किंमतीमध्ये वाढ झाली आहे.

(३) होय हे खरे आहे.

मा. ना. श्री. उदय सामंत पालकमंत्री, रायगड जिल्हा यांच्या अध्यक्षतेखाली दि. ३१/१०/२०२२ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये प्रकल्पाच्या धरण बुडीत क्षेत्रासाठी आवश्यक १०३.८१.२ हेक्टर खाजगी जमिनीच्या संपादनासाठी चालू दराने नुकसान भरपाई मिळण्या संदर्भात शेतक-यांची मागणी शासन स्तरावर सादर करण्याचे अप्पर जिल्हाधिकारी यांनी अश्वासित केले. या अनुषंगाने शेतक-यांच्या मागणीनुसार कार्यवाही करण्यासाठी सानुग्रह अनुदानाचा प्रस्ताव कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचे पत्र क्र. कोपाविम/ ता ४/ सांबरकुंड भुसंपादन/ २०३४ / सन २०२३ दि. १३/०६/२०२३ अन्वये शासनास मान्यतेसाठी प्राप्त झाला. सदर प्रस्तावाबाबत मा. उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री यांचे अध्यक्षतेखाली दि. १९/०७/२०२३ रोजी झालेल्या बेठकीमध्ये मा. उपमुख्यमंत्री यांनी सरळ खरेदी व २०१३ च्या अधिनियमाप्रमाणे जमिनीचे दर जिल्हाधिकारी रायगड यांचेकडून परिगणित करुन निवाड्या व्यतिरीक्त रक्कमेचा सानुग्रह अनुदान प्रस्ताव मंत्रीमंडळ बेठकीमध्ये ठेवण्याबाबात आदेशित केले असून , त्या अनुषंगाने विभागीय कार्यालयाच्या पत्र क्र. हेमप्रवि/ प्रशा १ / सांबरकुंड दर निश्चिती/ १६४९/ सन २०२३ दि. ०८/०८/२०२३ अन्वये जिल्हाधिकारी रायगड यांस सरळ खरेदी व २०१३ च्या अधिनियमाप्रमाणे जमिनीचे दर परिगणित करुन मिळणेबाबत कळविले आहे.

(४) प्रकल्पास आवश्यक २६३.५४० हे. वनजमिन हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करुन प्रकल्पाच्या कामास सुरुवात करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रकल्पास वन जमिन संपादनास मान्यता प्राप्त नसल्याने प्रकल्पाचे काम सुरु करण्यात आले नाही. प्रकल्पाचा वन जमिन संपादन प्रस्ताव पर्यावरण वन आणि जलवायू परिवर्तन मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडे स्टेज-१ मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून त्यांचे मार्फत उपस्थित शेऱ्याची पुर्तता करणेची कार्यवाही सुरु आहे. प्रकल्पाचा पुनर्वसन आराखडा जिल्हाधिकारी रायगड यांना सक्षम स्तरावरील मान्यतेच्या कार्यवाहीसाठी सादर केला आहे. पुनर्वसन आराखड्यास मान्यता प्राप्तीनंतर नागरी सुविधांची कामे करण्याचे नियोजित आहे.

---

## नांदगाव उसरोली व मजगाव (ता.मुरुड, जि.रायगड) येथील प्रस्तावित वांद्रे धरण रद्द करण्याबाबत

**(९) ६६९२५ (०३-०९-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव उसरोली व मजगाव (ता.मुरुड, जि.रायगड) ग्रामपंचायतीच्या हद्दीतील गावांची भविष्यकालीन पाण्याची गरज भागविण्यासाठी शासनाने प्रस्तावित असलेल्या वांद्रे धरण स्थानिक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या पुनर्वसन समस्यांकडे

दुर्लक्ष होत असल्याने, ग्रामस्थांनी विरोध करीत वांद्रे ऐवजी मजगाव जवळील खोकरी धरण बांधण्यात यावे, अशी मागणी प्रकल्पग्रस्तांनी केली असून त्याबाबतचे एक सविस्तर निवेदन प्रकल्पग्रस्तांच्या वतीने श्री. दत्ताराम धनावडे यांनी मा. मुख्यमंत्र्यांकडे माहे मार्च २०२३, मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, भरपाई, मोबदला, वनविभाग, गुरचरण जमीन, पर्यावरण विषयक परवानग्या न घेता केवळ राजकीय हेतू साधण्यासाठी काही स्थानिक लोकप्रतिनिधी लोकांची दिशाभूल करत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रस्तावित केलेल्या वांद्रे धरण प्रकल्प एकूण ७०.४२.६ हेक्टर जमिनीपैकी ५४.२२.०० हेक्टर जमिनवर असून सध्या लोकांचा उदरनिर्वाह याच शेतीवर अवलंबून आहे त्याचप्रमाणे फोपली गावातील ३०० लोकवस्ती व शेत जमीन, वांद्रेतील ६०० लोकवस्ती व शेतजमीन, खापरी गावातील ३०० लोकवस्ती, व शेतजमीन आणि करणी गावातील लोकवस्ती व त्यांची शेतजमीन यामुळे प्रभावित होणार असल्याने लोकवस्ती व शेतजमीन त्याच प्रमाणे फणसाड अभयारण्य कायद्याच्या तरतुदींचा विचार करून वांद्रे प्रकल्प रद्द करावा अशीही मागणी मा. मुख्यमंत्र्यांना सादर केलेल्या सदर निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय:
(४) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करून वाद्रे प्रकल्प रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
ग्रामस्थ वांद्रे करंजा, खापरी, फोपली, शेतकरी संघटना, ता. मुरुड/रोहा, जि. रायगड, यांनी मा. मुख्यमंत्री यांना दिनांक १३/३/२०२३ रोजीचे निवेदन सादर केलेले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) अंशत: खरे आहे.

सदर प्रकल्प हा भविष्यकालीन प्रकल्प असून प्रकल्पाच्या प्राथमिक सर्वेक्षण अहवालानुसार प्रकल्पासाठी एकूण १४०.१५ हे. खाजगी जमिन आवश्यक असून बुडीत क्षेत्रात येणाऱ्या फोपट्यावाडीची लोकसंख्या साधारणत: १०७ आहे.

प्रकल्पाच्या सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषण अहवालाअंती प्रकल्पासाठी आवश्यक खाजगी, सरकारी व वनजमिन भूसंपादन आणि पुनर्वसन याबाबत प्रचलित नियमांनुसार कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रस्तावित ल.पा. योजनोचा उपयुक्त पाणीसाठा १०.५४९ द.ल.घ.मी. असून यामुळे मजगाव, नांदगाव, धांड, पांगली, अदी, खार्दोकुले, खारिकवाडा, आरवघर, वालवती, चिखलद, आंबिस्ते, असरोली आणि मनोर या गावांतील ६६७ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. मुरुड तालुक्यातील पंचक्रोशी कार्यक्षेत्रात ४० हजार हून जास्त लोकसंख्या असल्याने तेथील नागरिकांची पिण्याच्या पाणीटंचाईची समस्या लक्षात घेऊन सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. महेंद्र हरी दळवी यांनी मुख्यमंत्री महोदयांना वांद्रे ता. मुरुड जि. रायगड येथे धरण पाणीपुरवठा योजना करणेबाबत दिनांक १/३/२०२३ रोजी मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाने मा. उप मुख्यमंत्री (जलसपंदा) यांच्याअध्यक्षतेखाली दि. १९/०७/२०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये वांद्रे धरण पाणीपुरवठा योजना प्रकल्पाबाबत सविस्तर सर्वेक्षण करुन पाणी उपलब्धता प्रमाणपत्रासह परिपुर्ण प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत कार्यकारी संचालक, कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांना पुढील कार्यवाही करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

तसेच, पंचक्रोशी पायाभुत सुविधा समिती, ग्रामस्थ व सदस्य पंचक्रोशी, मु.पो. नांदगाव ता. मुरुड-जंजिरा जि. रायगड, यांनी मा. मुख्यमंत्री यांना वांद्रे ता. मुरुड जंजिरा, रायगड धरण पाणी पुरवठा योजना पूर्ण करणेबाबत निवेदन दिले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबईतील कामोठे सेक्टर ३५ येथील एक भूखंड मृत नातेवाईकाना जिवंत दाखून एका खाजगी बांधकाम व्यवसायिकाला विक्री केल्याबाबत

**(१०) ६६९३१ (२७-०९-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामोठे सेक्टर ३५ येथील एक भूखंड १४ सप्टेंबर २००४ रोजी सिडकोने पनवेल मधील माजी नगरसेवक सुनील गोविंद बहिरा आणि विष्णू गोविंद बहिरा तसेच इतर यांच्या नावाने ताबे पावती करून दिला होता पावती मिळाल्यानंतर या भूखंडाच्या एकूण मालकांपैकी विष्णू गोविंद बहिरा यांचे १९ मे २००५ रोजी निधन झाले त्या निधनाची नोंद पनवेल नगरपरिषदेकडे आसून यांच्या मृत्यूनंतर या भूखंडाचा मालकी हक्क मिळवण्यासाठी विष्णू गोविंद बहिरा यांना जिवंत असल्याचे दाखून पनवेल आणि उरण दुय्यम निबंधक कार्यालयात एक नाही तर तब्बल तीन दस्त बनवून हा सदरचा भूखंड पत्नी आणि इतर बांधकाम व्यवसायिकांच्या नावने करून दिल्याचा आरोप आरटी आय कार्यकर्ता गणेश वाघीलकर यांनी पनवेल शहर पोलीस स्टेशन तसेच खांदेश्वर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माजी नगरसेवक आणि इतर व्यक्तींनी १३ फेब्रुवारी २००६ रोजी सिडको सोबत भाडेपट्टी कराराचा दस्त दुय्यम निबंधक कार्यालय, उरण या ठिकाणी उपस्थित राहून केला असल्याचे आरटी आय कार्यकर्ता गणेश वाघीलकर यांनी सादर केलेल्या लेखी तक्रार अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मयत नातेवाईक मालकाला जिवंत दाखून सिडकोसोबत पहिला भाडेपट्टा करार केला, त्यानंतर आपल्या ताब्यातील प्लाँट, पत्नी आणि इतर व्यक्तीला त्रिपक्षीय तयार करून दिला आणि या दोघांनी मिळून एका व्यवसायिकाला हा प्लाँट दुय्यम निबंधाकडे दस्त बनवून दिला, हेही खरे आहे काय;

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले वा त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१२-२०२३) :** (१) व (२) होय, सुनिल गोविंद बहिरा यांनी कै. विष्णू गोविंद बहिरा ही व्यक्ती दिनांक १९ मे २००५ रोजी मयत असताना त्यांच्या ठिकाणी ति-हाईत खोटा व्यक्ती उभा करून दि. १३ फेब्रुवारी, २००६ रोजी सिडकोकडून वरील भूखंड स्वतःच्या नावे करून शासनाची फसवणूक केली म्हणून श्री. सुनिल गोविंद बहिरा व इतर १० यांच्यावर चौकशी करून गुन्हा दाखल करण्यात यावा अशा आशयाचा अर्ज श्री. गणेश वाघोलीकर यांचेकडून कामोठे पोलीस ठाणे येथे दाखल करण्यात आला आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने पोलीस विभागाकडून चौकशी सूरू असून अद्यापि गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

(३) महसूल विभागाने उपलब्ध करून दिलेल्या माहितीनुसार, सदर प्रकरणी महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळासोबत उरण, दुय्यम निबंधक कार्यालय येथे दस्त क्र.८२४/२००६ व दस्त क्र. ५१९५/२००६ आणि पनवेल दुय्यम निबंधक कार्यालय येथे दस्त क्र. २७२३/२००६ अन्वये भाडेपट्टा दस्त नोंदविण्यात आला असल्याचे दिसून येते.

(४) प्रस्तुत प्रकरणी कामोठे पोलीस ठाणे यांचेमार्फत चौकशी सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शालेय पाठ्यपुस्तकांवरील सेवा व वस्तु करामध्ये वाढ केल्याबाबत

**(११) ६७०२७ (२७-०९-२०२३). श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यार्थ्यांच्या पाठीवरचे ओझे कमी करण्याचा शासनाचे प्रयत्न सुरु असतांनाच पाठ्यपुस्तकांवरील सेवा व वस्तु

कराच्या (जीएसटी) किंमतीमध्ये १८ टक्के वाढवल्यामुळे पालकांना आर्थिक भार सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने पाठ्यपुस्तकांवरील सेवा व वस्तु कर कमी करण्याच्या दृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (१०-१०-२०२३) :**(१) हे खरे नाही.
वस्तू व सेवाकर कायद्यांतर्गत शालेय पाठ्यपुस्तके सुरवातीपासूनच (जुलै २०१७ पासून) करमुक्त आहेत.
(२) लागू नाही.
(३ ) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात लाचखोरी प्रकरणासंबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होण्याबाबत**

**(१२) ६७१०७ (२९-०८-२०२३). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) : दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १४९ मधील प्रश्न क्रमांक ४९४५२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०१३ पासून आतापर्यंत लाचखोरी प्रकरणी कारवाई होऊन देखील १७४ लाचखोरांचे निलंबन करण्यात आले नसल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई परिक्षेत्रातील सर्वाधिक ३१ तर नागपूर परिक्षेत्रातील ५५ लाचखोरांचा समावेश असुन यामध्ये प्रथमश्रेणी अधिकारी १४, व्दितीयश्रेणी २१, तृतीयश्रेणी ८५, चतुर्थश्रेणी ५ व इतर लोकसेवक ४९ असे एकुण १७४ लाचखोर अजुनही कामावर हजर आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती लाचखोर अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यास विलंब करणाऱ्या शासनाच्या सर्व विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२३) :** (१), (२) व (३)
I. सन २०१३ पासून ते दिनांक ३१.०३.२०२३ पर्यत लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत लाचखोरी प्रकरणात कारवाई होवून देखील निलंबित न झालेल्या आरोपी लोकसेवकांची संख्या १७४ एवढी आहे.
II. तसेच निलंबित न करण्यात आलेल्या आरोपी लोकसेवकांची यादी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत दर महिन्याला अद्यावत करण्यात येते. त्यानुसार दिनांक ०५.०९.२०२३ पर्यत एकूण २०१ आरोपी लोकसेवकांचे लाचखोरी प्रकरणात कारवाई करुन देखील निलंबन करण्यात आलेले नसल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कळविले आहे.
III. निलंबन न झालेल्यांमध्ये मुंबई परिक्षेत्रातील ३४ व नागपूर परिक्षेत्रातील ५९ आरोपी लोकसेवकांचा समावेश असून त्यामध्ये "गट-अ", " गट-ब", " गट-क", "गट-ड" चे अनुक्रमे १७, २७, ७७, ८ अधिकारी/कर्मचारी व इतर ७२ असे एकूण २०४ लोकसेवकांचा समावेश आहे.
IV. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून गुन्हा दाखल झाल्यावर आरोपी लोकसेवकाचे निलंबन व बडतर्फ करण्याचे अधिकार हे आरोपी लोकसेवकाच्या संबंधित सक्षम प्राधिकारी यांना असतात. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील आयोजित आढावा बैठकीमध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईत दोषी आढळलेल्या लोकसेवकांना सेवेतून निलंबित करण्याबाबतचा आढावा घेऊन योग्य त्या सूचना देण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर जिल्हयात सोशल मिडिया, विविध ॲपच्या माध्यमातून ऑनलाईन पध्दतीने नागरिकांची फसवणूक होत असल्याबाबत

**(१३) ६७१३५ (२९-०८-२०२३). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयात माहे जानेवारी ते एप्रिल, २०२३ या कालावधीत सोशल मिडिया, विविध ॲपच्या माध्यमातून ऑनलाईन पध्दतीने कोटयावधी रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फसवणूक करणाऱ्या टोळया या परराज्यातील असून फसवणूकीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे तेथील नागरीकांत तीव्र असंतोष पसरलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आतापर्यंत किती गुन्हेगारांना पकडण्यात आले आहे व त्यांच्याकडील किती मुद्देमाल हस्तगत करण्यात आला, परराज्यातील टोळीचा कायमचा बंदोबस्त करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-११-२०२३) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

लातूर जिल्हयात माहे जानेवारी ते एप्रिल,२०२३ या कालावधीत सोशल मिडिया, विविध ॲपच्या माध्यमातून ऑनलाईन पध्दतीने फसवणूकीचे लातूर जिल्हा आस्थापनेवर वेगवेगळया पोलीस ठाण्यास एकूण ०८ गुन्हे दाखल असून त्यात एकूण रु.७७,२७,४९०/- रुपयांची फसवणूक झाली आहे.

दाखल गुन्हयांच्या अनुषंगाने नागरिकांची फसवणूक झाल्याचे दिसून येत असून आरोपींना अटक करण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

(३) सदर गुन्हयातील आरोपींचा शोध व तपास चालू असून अदयाप पर्यत गुन्हयांतील मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला नाही. सदर गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने आरोपींनी गुन्हयात वापरलेल्या मोबाईल क्रमांकाचे सीडीआर व एसडीआर तसेच आरोपींचे लोकेशनसाठी संबधीत मोबाईल कंपन्याना पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. तसेच नागरिकांची फसवणूक झालेल्या रक्कमे संदर्भात संबधीत बँकांना पत्रव्यवहार व इमेलव्दारे कळवून आरोपींनी वापरलेल्या विविध अकाउंटची संपूर्ण माहिती प्राप्त करण्यात येत आहे.

राज्यात सायबर गुन्ह्यांच्या तपासाकरीता एकुण ४८ सायबर पोलीस ठाणी कार्यान्वित झाली आहेत. सायबर गुन्ह्यांना आळा घालण्याकरीता विविध पोलीस घटकातील एकूण ३२५३ पोलीस अधिकारी व अंमलदारांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. सर्व सायबर पोलीस ठाण्यांना गुन्ह्याच्या तपासाकरीता अत्याधुनिक यंत्रसामग्री, विविध प्रकारचे १६ टूल्स उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सायबर पोलीस ठाण्यात कार्यरत १००० पोलीसांना सायबर गुन्ह्यांच्या तपासात मदत व्हावी यासाठी तज्ञ सल्लागारांच्या मदतीने फॉरेन्सिक टूल्सचे ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले आहे. सायबर गुन्हे संदर्भातील सर्व प्रकारच्या तक्रारी हाताळण्यासाठी National Cyber Crime Reporting Portal सुरू करण्यात आले आहे व नागरिकांना येणा-या शंकाचे समाधान करण्यासाठी टोल फ्रि हेल्प लाईन क्र.१९३० सुरु करण्यात आला आहे. संभाव्य सायबर गुन्हे टाळण्यासाठी जन जागरुकता शिबिरे घेतली जातात. तसेच सोशल मिडियाद्वारे, इंटरनेट माध्यमांद्वारे देखील सर्व सामान्य नागरिकांना सायबर गुन्ह्याच्या अनुषंगाने सावध राहण्याचे आवाहन केले जाते. सायबर गुन्हयांना आळा घालण्यासाठी मार्गदर्शिका (ॲडवायझरी) प्रसारित करून सायबर गुन्ह्यांबाबत माहिती दिली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

**पूर्व विदर्भात प्राचीन काळातील बोळी (लहान तलाव) जलसिंचनाचा साठा नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याबाबत**

**(१४) ६७२८१ (३०-०८-२०२३). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्व विदर्भात सिंचनासाठी महत्वाचे मॉडेल असलेल्या तसेच भातशेतीसाठी वरदान ठरलेल्या बोळी (लहान तलाव) प्रशासनाच्या दुर्लक्षतेमुळे नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी व शासकीय जमिनीतील बोळी बुजवल्या गेल्याने भुजल पातळी कमी होत असल्याने या बोळी जलसिंचनाचे स्रोताचे नव्याने विकास करण्याच्या दृष्टिने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०७-११-२०२३) :** (१) नाही. हे खरे नाही.

(२) यापुर्वी सन २०१६-१७ ते २०१९-२० या कालाधीकरिता माजी मालगुजारी तलाव पुनर्जिवन व बळकटीकरण कार्यक्रम राबविण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत माजी मालगुजारी तलावांची दुरुस्ती कामे मुख्यमंत्री जलसंवर्धन दुरुस्ती कार्यक्रम अंतर्गत हाती घेण्यात आलेली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विक्रमगड, (जि.पालघर) तालुक्यातील देहर्जे मध्यम प्रकल्पास बाधितांचा विरोध होत असल्याबाबत**

**(१५) ६७५८४ (०३-०९-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील देहर्जे धरणाचे काम सुरु असल्याने साखरे खुडेद व जांभे या गावातील ४०२ आदिवासी कुटुंबे बाधित झाली असून त्यांचे अदयाप पुनवर्सन करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने हा प्रकल्प करताना सदरील बाधितांना विश्वासात घेतले नसून ग्रामपंचायत यांची नाहरकत घेतलेली नसल्याने प्रकल्प रदद करावा अशी मागणी बाधितांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बाधिताचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-१०-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

प्रस्तावित देहरजी प्रकल्पामुळे साखरे व खुडेद या गावातील जवळपास २५० कुटुंबे बाधित होणार असून त्यांच्या पुनर्वसनासाठी स्थळनिश्चिती अंतिम टप्प्यात आहे

(२) हे खरे नाही.

ग्रामपंचायत ग्रामसभा-जांभे व सुकसाळे, ग्रामसभा-साखरे व ग्रामसभा-खुडेद यांनी प्रकल्पास सहमती दर्शवली आहे, व देहरजी मध्यम प्रकल्पासाठी जमीन संपादन करण्यास ग्रामस्थांनी सर्वानुमते मंजुरी दिली आहे

(३) भूसंपादन अधिनियम २०१३ कलम ४५ नुसार प्रकल्प स्तरावरील पुनर्वसन पुनर्वसाहत समितीच्या दि.२५/०८/२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये सर्वेक्षण अहवालानुसार बाधित गावातील लोकांचे पुनर्वसन खरीवली त.कोहोज ता.वाडा या

ठिकाणी करणेकामी समितीवरील उपस्थित सर्व सदस्यांनी एकमताने मान्यता दिली असून त्यानुसार पुनर्वसन करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा नियोजन समित्यांचे कामकाजाकरिता शासनाने सुरु केलेली आयपास संगणक प्रणाली बंद असल्याबाबत

**(१६) ६७६९७ (२७-०९-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा नियोजन समित्यांचे कामकाज संगणकाव्दारे व कागदविरहीत करण्यासाठी शासनाने सुरु केलेल्या आयपास या संगणक प्रणालीच्या देखभाल, दुरुस्ती तसेच भाड्यापोटीच्या थकलेल्या रक्कमेमुळे या कामाचा ठेका दिलेल्या कंपनीने दिनांक १ एप्रिल , २०२३ पासून प्रणाली बंद केली आहे , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधीत कंपनीने माहे मार्च, २०२३ पर्यतचा डेटा शासनास उपलब्ध केलेला नसल्यामुळे सन २०२२ - २०२३ या आर्थिक वर्षाच्या कामकाजाची नोंद शासनाकडे नसल्यामुळे नियोजन समित्यांचे कामकाज पुर्णपणे विस्कळीत झालेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी नियोजन विभागाचे कामकाज सुरळीत होण्यासाठी तांत्रिक दोष दूर करुन पूर्ववत आयपास प्रणाली सुरु ठेवण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास , विलंबाची कारणे कोणती आहेत?

**श्री. अजित पवार (१२-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.
आयपास संगणकीय प्रणालीमध्ये फेब्रुवारी २०२३ मध्ये उद्भवलेल्या तांत्रिक अडथळयामुळे या प्रणालीचे पुनर्विलोकन करुन बळकटीकरण करण्यासंदर्भात आढावा घेण्याच्या अनुषंगाने प्रणालीचे काम दिनांक ०१/०४/२०२३ पासून तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करण्यात आले होते.
(२), (३) व (४) हे खरे नाही.
आयपास प्रणालीवरील डेटा सुरक्षित असून तांत्रिकदृष्ट्या प्रणालीच्या बळकटीकरणानंतर सदर प्रणाली दिनांक ०१/०७/२०२३ पासून पुन्हा पूर्ववत कार्यान्वित करण्यात आली आहे.

---

## मिरा –भाईदर वसई विरार पोलिस आयुक्तालयातील पोलीसाला लाच मागितल्याप्रकरणी केलेली अटक

**(१७) ६७७६९ (२७-०९-२०२३). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.अजय चौधरी (शिवडी), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरा –भाईदर वसई विरार पोलिस आयुक्तालयातील सातव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम व वैदयकिय देयक मंजुरीसाठी लाच मागितल्याप्रकरणी एका पोलिसांला दिनांक १० मे,२०२३ रोजी वा त्या सुमारास अटक करण्यात आली आहे, हेही खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधित दोषीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२३) :** (१) व (२)

I. सदर प्रकरणी आरोपी लोकसेवक क्र.१, वरिष्ठ लिपिक (वर्ग-३), मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांनी तक्रारदार यांच्या ६ व्या वेतन आयोगाच्या फरकाबाबत ना देय प्रमाणपत्र देण्यासाठी तसेच वैद्यकीय बिल मंजुरीकरीता आलोसे क्र.२ यांना बोलावून तक्रारदार यांच्याकडे १,०००/- रुपये इतक्या लाचेची मागणी केल्याचे तसेच दिनांक १७/०४/२०२३ रोजी आलोसे क्र.२, लिपीक, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यालय (वर्ग-३) यांनी तक्रारदार यांच्याकडे वैदयकीय बिलाच्या मंजुरीसाठी तक्रारदार यांच्याकडे १,५००/- रुपये लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून करण्यात आलेल्या सापळा कारवाईदरम्यान निष्पन्न झाल्याने संबंधित दोन्ही आरोपी लोकसेवक यांनी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७ प्रमाणे दंडनीय अपराध केल्याने त्यांच्याविरुध्द दिनांक ०९/०५/२०२३ रोजी काशिमिरा पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद क्र.३३८/२०२३ प्रमाणे दिनांक गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

II. सदर गुन्हयाच्या अनुषंगाने आलोसे क्र.१ यांना दिनांक ३०.०५.२०२३ रोजी मा.न्यायालयाने अटकपूर्व अंतरीम जामीन मंजूर केलेला असून आलोसे क्र.२ यांना दिनांक ०९/०५/२०२३ रोजी अटक करण्यात आली असून त्यांना दिनांक १२/०५/२०२३ रोजी जामीन मंजूर झालेला आहे. सदर गुन्हयाचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर यांच्यामार्फत सुरू आहे.

III. सदर प्रकरणी, संबंधित दोन्ही आरोपी लोकसेवकांना अपर पोलीस आयुक्त, मिरा-भाईदर वसई-विरार, आयुक्तालय यांच्या दिनांक १२.०५.२०२३ रोजीच्या आदेशान्वये पुर्वलक्षी प्रभावाने म्हणजेच दिनांक ०९.०५.२०२३ पासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सारूळ (ता. केज, जि. बीड) येथील २२०/१३२ केव्ही मंजूर उपकेंद्राचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(१८) ६७९२२ (२६-०९-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सारूळ (ता. केज, जि. बीड) येथील २२०/१३२ केव्ही उपकेंद्र मंजूर होऊनही अद्याप सदर उपकेंद्राचे काम सुरु करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विजेच्या समस्या पाहता सदर उपकेंद्राची तातडीने निविदा प्रक्रिया पूर्ण करून काम सुरु करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ऊर्जा मंत्री यांचेकडे दिनांक २३ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०२३) :**(१) होय हे खरे आहे.

(२) सारुळ उपकेंद्राची तातडीने निविदा प्रक्रिया पूर्ण करून काम सुरु करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ऊर्जा मंत्री यांचेकडे केली नसून मा. प्रधान सचिव (ऊर्जा) यांचेकडे दिनांक २३ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या पत्रान्वये केली आहे.

(३) महापारेषण कंपनीद्वारे सारुळ, ता. केज, जि. बीड येथे २२०/३३ के.व्ही. उपकेंद्र उभारणीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देऊन मा. वीज नियामक आयोगाच्या मान्यतेसाठी दि. ०६.०१.२०२३ अन्वये पाठविण्यात आला होता .

मा. आयोगाकडून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (भांडवली गुंतवणुकीच्या योजनांना मान्यता) नियमन, २०२२ अंतर्गत तांत्रिक व आर्थिक तरतुदींची पडताळणी करुन पूर्तता करण्याचे निर्देश दिले आहेत. मा. आयोगाच्या निर्देशानुसार प्रस्ताव पुनश्च: सादर करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तिवसा तालुका (जि.अमरावती) येथील गुरुकुंज उपसा सिंचन कामामुळे झालेल्या शेतीची नुकसान भरपाई मिळणेबाबत**

**(१९) ६७९४४ (०३-०९-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील नितेश हरिभाऊ साबळे, रा.मालधुर यांचे शेत सर्व्हे नं.१४१ मध्ये शेतक-यांची पुर्वपरवानगी न घेता शेताच्या मधोमध गुरुकुंज उपसासिंचनाच्या कामामुळे पिकाचे प्रचंड नुकसान झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुरुकुंज उपसा सिंचन कामामुळे शेतक-याला झालेल्या पिकांची नुकसान भरपाई मिळणेबाबत संबंधित असलेले अधिकारी व कंत्राटदार यांना पत्र देवूनही नुकसान भरपाई मिळाली नाही, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, यासंदर्भात उचित कार्यवाही करण्यासाठी मा.लोकप्रतिनिधी यांनी मा.कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, अमरावती यांना दि. १५ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने नुकसानग्रस्त शेतक-याला नुकसान भरपाई मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०२३) :**(१) होय, अंशत: खरे आहे,

शेत सर्व्हे नं. १४१ यामध्ये काम करताना श्री. नितेश हरिभाऊ साबळे, रा. मालधुर यांचे सहमती पत्र घेऊन शेताच्या मधोमध बांधकाम करण्यात आले आहे.

(२) होय, अंशत: खरे आहे.

गुरुकुंज उपसा सिंचन कामामुळे पिकाचे नुकसान भरपाई संबंधित शेतक-याला देण्यात आली आहे.

(३) होय,हे खरे आहे.

कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती यांचे पत्र दि.६/९/२०२३ अन्वये संबंधीत आमदार महोदयांना अहवाल सादर केला आहे.

(४) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असुन, नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे. सदर जमिनीचे भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे. कार्यवाही पूर्ण करुन शेतक-याला मोबदला अदा करण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे देवगांव (ता.जि.अमरावती) येथील जलसंपदा विभागाच्या ताब्यातील वापरात नसलेली जमीन ग्रामीण पाणीपुरवठा योजनेकरिता मिळण्याबाबत**

**(२०) ६७९५६ (०३-०९-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे देवगांव (ता.जि.अमरावती) येथील जलसंपदा विभागाच्या ताब्यातील वापरात नसलेली गट क्र.७७ व ७९ मधील ०.९० हेक्टर जमीन जलशुध्दीकरण व सोलर पॅनल लावण्याकरीता संबंधित विभागाने मागणी केलेली असून योग्य मोबदला घेऊन ग्रामीण योजना पाणी पुरवठा योजनेसाठी मिळण्याबाबत नियामक मंडळाकडे प्रस्ताव सादर केला आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ डिसेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांना लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर नियामक मंडळाचे ८३ वी बैठक दि.१९.०६.२०२३ मधील मंजूर ठराव क्र. ८३/२३ नुसार बोर नदी प्रकल्प, ता. जि. अमरावती या प्रकल्पाची मौजे देगाव येथील गट क्र. ७७ व ७९ मधील ०.९० हेक्टर शिल्लक जमिन महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागास प्रचलित शासन निर्णयानुसार मोबदला घेवून जलजीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनेसाठी जलसंपदा विभागाच्या शासन निर्णय क्र.बिसिंआ-२०२१/(१६१/२१)/सिंव्य(धो-२), दि.०५.०५.२०२२ अन्वये नियामक मंडळाची सर्वानुमते मान्यता प्राप्त झाली आहे.
(२) लोकप्रतिनिधीचे निवेदन कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर कार्यालयास अप्राप्त असल्याचे त्या कार्यालयाने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमरावती जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२२-२३ चा आराखडा मंजुर करण्याबाबत

**(२१) ६८२७१ (२९-०८-२०२३). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२२-२३ चा आराखडा मंजुर करण्यासाठी प्राप्त प्रस्ताव व मंजुर नियतव्ययानुसार संबधित यंत्रणेकडून प्रस्ताव प्राप्त झाले होते, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, संबधित यंत्रणेकडून लेखाशिर्ष निहाय प्राप्त प्रस्तावानुसार व सन २०२२-२३ चे मंजुर नियत व्ययानुसार जिल्हा वार्षिक योजना समितीला प्रस्ताव प्राप्त झाले नसल्यास त्याबाबतची सविस्तर कारणे संबधित यंत्रणेकडून मागविण्यात आली होती, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुर्नविनियोजने नंतर ज्या लेखाशिर्षामध्ये निधी वळता करणे आवश्यक होता, त्याबाबतची सविस्तर कारण मिमांसा पुर्नविनियोजन प्रस्तावात विषद केली आहे काय तसेच प्रशासकीय मान्यता व निधी वितरण केल्यानंतर संबंधित यंत्रणेकडून निधी सर्मपित केला असल्यास त्याबाबतची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (१२-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे
(२) सर्व यंत्रणांकडून विहित मुदतीत प्रस्ताव झाले होते
(३) पुर्नविनियोजन करताना ज्या लेखाशिर्षामध्ये निधी वळता करण्यात आला आहे, त्याबाबतची सविस्तर कारणे पुर्नविनियोजन प्रस्तावात विषद करण्यात आली आहेत. सन २०२२-२३ मध्ये प्रशासकीय मान्यता व निधी वितरणानंतर अमरावती जिल्ह्यातील कोणत्याही यंत्रणेकडून निधी समर्पित करण्यात आलेला नाही.

---

### महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिसरण (महाऊर्जा), विभागीय कार्यालय, अमरावती यांचे कामांना प्रशासकीय मान्यता न देता सदर निधी इतर विभागाकडे वळविल्याबाबत

**(२२) ६८२९० (२७-०९-२०२३). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिसरण (महाऊर्जा), विभागीय कार्यालय, अमरावती यांच्या कामासाठी जिल्हा नियोजन समिती, अमरावती यांचेकडे रु. ५.०० कोटी इतका नियत व्यय होता तसेच संबधित कार्यालयाकडून IPASS वर मंजुरीसाठी प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे सादर करणे आवश्यक होते, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिसरण (महाऊर्जा), विभागीय कार्यालय, अमरावती यांचे कार्यालयाकडून किती किंमतीचे प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे सादर करण्यात आले होते,
(३) असल्यास, अपारंपारीक ऊर्जेला प्रोत्साहन देण्याचे शासनाचे धोरण असतांना सुध्दा महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिसरण (महाऊर्जा), विभागीय कार्यालय, अमरावती यांचे कामांना प्रशासकीय मान्यता न देता सदर निधी पुनर्विनियोजन करुन निकषांचे आधारे प्राधान्यक्रम सुनिश्चित करून अन्य विभागाकडे वळती करणे गरजेचे असतांना देखील सदर निधी परत पाठविण्यात आला आहे, हेखरे आहे काय,
(४) असल्यास, महाऊर्जेसाठी नियत व्यय ५ कोटी निधी महाऊर्जेला न देता नियमबाह्यरित्या अन्य विभागाकडे वळती करणाऱ्या जिल्हा नियोजन समितीच्या संबंधित अधिकारी- कर्मचारी यांचे विरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार (१२-१०-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे
जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२२-२३ अंतर्गत अपारंपारीक उर्जाविकास या योजनेकरीता रुपये ८ कोटी इतका नियतव्यय ठेवण्यात आला होता.
(२), (३), (४) व (५) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेसाठी पुनर्विनियोजनाने निधी उपलब्ध करुन द्यावयाचा असल्याने अन्य १७ यंत्रणांसोबतच महाउर्जा यांचेकडील योजनेतून पुनर्विनियोजनाद्वारे रुपये ३.३१ कोटी इतकी घट प्रस्तावित करण्यात आली होती.
उर्वरित रुपये ४.६९ कोटीपैकी महाराष्ट्र उर्जा विकास अभिसरण (महाउर्जा) विभागीय कार्यालय, अमरावती यांचेकडून रुपये ३.०५ कोटीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यास अनुसरुन रुपये ३.०३ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

---

## जिल्हा नियोजन समिती, अमरावती कडून माहे - २०२२ अखेरीस प्राप्त झालेला निधी इतर कामास वळती केल्याबाबत

**(२३) ६८२९२ (२७-०९-२०२३). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा नियोजन समिती, अमरावती कडून माहे - २०२२ अखेरीस शासनाच्या विविध विभागास नियमबाह्य पध्दतीने रु. २५.०० कोटी इतका निधी वितरीत केला आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, विविध योजनेचा विविध विभागास वितरीत करण्यात आलेला निधी पुढील आर्थिक वर्ष २०२२ - २०२३ मध्ये वेगवेगळी खरेदी व इतर कामांसाठी शासनाचे सर्व नियम धाब्यावर बसवुन उपयोगात आणला आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (१२-१०-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही
माहे मार्च २०२२ मध्ये रुपये ४२.९८ कोटी एवढा निधी पुर्नविनियोजनाद्वारे संबंधित यंत्रणांना मागणीनुसार वितरीत करण्यात आला आहे. सदर खर्चास व पुर्नविनियोजनास दिनांक ०७/१०/२०२२ रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या सभेमध्ये मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हयातील २४० गावात जलयुक्त शिवार योजना-२ राबविण्यासाठी कामाचा आराखडा तयार करुन निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(२४) ६८५२० (३१-०८-२०२३). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील जलयुक्त शिवार योजना-२ अंतर्गत २४० गावात या योजना राबविण्यात येणार असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावांमध्ये राबविण्यात आलेल्या जलयुक्त शिवार योजना -२ अंतर्गत कामाचा आराखडा तयार करुन निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे, हे ही खरे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गावांमध्ये जलयुक्त शिवार योजना -२ अंतर्गत कामे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०३-११-२०२३) :** (१), (२) व (३)

जलयुक्त शिवार अभियान २.० मध्ये अहमदनगर जिल्हयातील ३६८ गावांची निवड करण्यात आली आहे. निवड करण्यात आलेल्या ३६८ गावांचे गाव आराखडे पुर्ण करुन जिल्हा समितीस सादर करण्यात आले आहेत.

जलयुक्त शिवार अभियान २.० अभियानाअंतर्गत विविध विभागांच्या अभिसरणातून कामे सुरु असून जलयुक्त शिवार अभियान २.० च्या निधीतून प्रस्तावित कामांचे अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता देऊन प्रशासकीय मान्यता देण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सरालावेट (ता.वैजापूर, जि.औरंगाबाद) येथील योगीराज सद्गुरु श्रीगंगागिरी महाराजांच्या समाधीस्थळाकडे जाणारा प्रमुख रस्ता व यावरील पुल धोकादायक झाल्याबाबत**

**(२५) ६८५४१ (३१-०८-२०२३). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सरालावेट (ता.वैजापूर, जि.औरंगाबाद) येथील योगीराज सद्गुरु श्रीगंगागिरी महाराजांच्या समाधी स्थळाकडे जाणारा प्रमुख रस्ता धोकादायक झाला असल्याने भाविकांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यावरील गोदावरी नदीचा भराव ढासळल्याने पुल धोकादायक झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०७-११-२०२३) :** (१) व (२) होय. हे खर आहे.

दिनांक ०४/०८/२०१९ रोजी नाशिक जिल्हामध्ये तसेच गोदावरी नदीच्या इतर पाणलोट क्षेत्रामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे गोदावरी नदीला महापूर आल्याने सदर को.प.बंधाऱ्याच्या दोन्ही तीराच्या भरावयाचे पार्श्ववहन झालेले असल्याने को.प.बंधारा धोकादायक झालेला आहे.

(३) सदर को.प.बंधाऱ्याच्या दुरुस्तीस शासन निर्णय दिनांक १४ ऑगस्ट,२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत सदर योजनेचे तांत्रिक मान्यता अंदाजपत्रक तयार करणे प्रगतीवर असून तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यावर निविदा प्रक्रिया राबवून त्वरीत दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येईल. सदर योजनेची दुरुस्तीनंतर योजनेमध्ये संकल्पित पाणीसाठा पुनस्थापित होईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यातील जलसंपदा विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२६) ६८५७८ (०३-०९-२०२३). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यातील जलसंपदा विभागातील एकूण मंजूर १२४ पदांपैकी निम्म्याहून अधिक पदे रिक्त असल्याने जिल्ह्यातील जलसंपदा विभागाची कामे प्रलंबित असल्याची बाब माहे एप्रिल,२०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे , हे खरे आहे काय,
(२) असल्यास हिंगोली जिल्ह्यातील जलसंपदा विभागाच्या वतीने प्रस्तावित असलेल्या पिंपळखुटा, बोराळा तलावासाठी प्रक्रिया आणि हळदवाडी येथील तलाव पिचिंगचे कामेही सुरू असल्याने केवळ २८ अधिकारी ,कर्मचारी जिल्ह्याचा कारभार सांभाळत असल्याने जलसंपदा विभागाची अनेक कामे अत्यंत संत गतीने सुरू आहेत, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, हिंगोली जिल्ह्यातील जलसंपदा विभागातील सर्व मंजूर पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०२३) :** (१)होय.
(२) अंशत: खरे आहे. तथापि, सद्य:स्थितीत चालू असलेल्या प्रकल्पांची कामे तसेच भूसंपादन उपलब्ध अधिकारी/ कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात येत आहेत.
(३) सरळसेवा भरती व पदोन्नतीच्या माध्यमातून रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु असून, सन २०२३ मध्ये पदोन्नती तसेच सरळसेवेने नियुक्तीव्दारे या विभागातील रिक्त पदांवर अधिकारी, कर्मचारी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई, चिंचपोकळी (पूर्व) येथील डॉक्टर कंपाऊंडमधील जुन्या प्रोग्रेसिव्ह उपकरप्राप्त चाळीच्या पुनर्विकास प्रकल्पात विकासकाने पात्र भाडेकरुंना घराचा ताबा दिला नसल्याबाबत**

**(२७) ६८६१७ (०३-०९-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील चिंचपोकळी (पूर्व), डॉक्टर कंपाऊंड येथील सी.एस.क्र.१ए/७८२, २/७८३, ७८४, ७८५ व ७८६ माझगांव विभाग या जुन्या उपकरप्राप्त प्रोग्रेसिव्ह चाळीच्या पुनर्विकास प्रकल्पात १७ वर्षे इतका कालावधी होऊनही अद्याप विकासकाने डीसी रुल ३३(७) अंतर्गत पुनर्विकास प्रकल्पात प्रस्तावित केलेल्या पाच इमारतीपैकी अद्याप पुनर्वसनाच्या इमारत क्र.४ ची पुर्नबांधणी केली नसतानाही विकासक व म्हाडाने शासनाला दिशाभूल करणारी असत्य माहिती देऊन अद्याप १०४ पात्र भाडेकरुंना घराचा ताबा दिलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पुनर्विकास प्रकल्पात पुनर्वसनासाठी प्रत्यक्षात किती सदनिकांचे बांधकाम करण्यात आले आहे व १९९पैकी किती मुळ पात्र रहिवाशी कुटुंबाचे पुनर्वसन केले आहे, तसेच अद्याप किती रहिवाशी कुटुंबांना सदनिका देऊन त्यांचे पुनर्वसन करणे बाकी आहे,

(३) असल्यास, सदरहू पुनर्विकास प्रकल्पात २५ हून अधिक सदनिका विकासकाने म्हाडाच्या अधिकाऱ्यांसमवेत आर्थिक संगनमत करुन परस्पर खरेदी करुन पुनर्वसनाच्या सदनिका ग्राहकांना विक्री करुन आर्थिक गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकल्पात म्हाडाला देय असलेल्या ३५९५ चौ.मी. अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळापैकी २३७४.९६ चौ.मी. अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ १७ वर्षे होऊनही अद्याप म्हाडाने ताब्यात न घेण्याची व त्यास लागत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत, त्यानुसार शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (०१-११-२०२३) :** (१) व (२) भूकर पाहणी क्रमांक १ ए /७८२, २/७८३, ७८३, ७८४, ७८५ आणि ७८६ माझगांव विभाग, या मिळकतीच्या पुनर्विकासासाठी ना-हरकत प्रमाणपत्र दि.२४.११.२००६ व दि.३०.०४.२०१४ रोजी सुधारित ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे. ना-हरकत प्रमाणपत्र धारकांने सदर पुनर्विकास योजनेत एकूण ०५ इमारती प्रस्तावित केल्या असून, यापैकी ०३ इमारती (इमारत क्र.१, २ व ३ या मुळ भाडेकरु / रहिवाशी यांच्या पुनर्वसनासाठी आहेत. ०२ इमारती (इमारत क्र. ४ व ५) या विक्रीसाठी प्रस्तावित केलेल्या आहेत. ना-हरकत प्रमाणपत्रधारकांने पुनर्वसनाच्या इमारत क्र. १, २ व ३ यांचे बांधकाम पूर्ण केलेले आहे व विक्रीपैकी इमारत क्र.५ चे बांधकाम पुर्ण झालेले आहे.

ना-हरकत प्रमाणपत्रधारक व भूखंडावरील असहकार्य करणाऱ्या गोदामधारक यांच्यामध्ये दि.२१.१०.२०२२ रोजी सहमती झालेली आहे व गोदामाचे पाडकाम करून इमारत क्र. ४ चे बांधकाम सुरु करण्यात आलेले आहे.

या योजनेत एकूण १९९ भाडेकरु / रहिवाशी असून उपकरप्राप्त इमारतीतील सर्व पात्र भाडेकरु / रहिवाश्यांना अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांना नविन पुनर्विकसीत इमारतीत कायमस्वरुपी निवासस्थानाचा ताबा देण्यात आलेला आहे.
(३) पुनर्विकसीत इमारत क्र.१, २ व ३ करिता भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर देखील ६७ भाडेकरु/रहिवाशी यांनी नविन पुनर्विकसीत इमारतीमधील सदनिकेचा ताबा घेत नसल्याबाबत सदर ६७ भाडेकरु/रहिवाशी यांच्यावर ९५अ अंतर्गत कार्यवाही करुन नविन इमारतीमधील सदनिकांचा ताबा देण्यात आलेला आहे.
(४) या योजनेमध्ये एकूण २३९७१.२९ चौ.मी. क्षेत्रफळ विक्रीसाठी उपलब्ध होणार आहे. म्हाड कायदा १९७६ च्या परिशिष्ट III नुसार, या विक्रीसाठी उपलब्ध क्षेत्रफळाच्या १५ टक्के म्हणजे ३५९५.६५ चौ.मी. क्षेत्र विकासकाने मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास सुपूर्द करणे बंधनकारक आहे. त्यापैकी १२२०.६९.चौ.मी. क्षेत्रफळ इमारत क्र.१, २ व ३ मध्ये मंडळास सुपूर्द केले आहे. योजनेचे काम अजुनही प्रगतीपथावर असून, विक्रीसाठी राखीव असलेल्या इमारतीपैकी इमारत क्र.४ चे बांधकाम अद्यापही शिल्लक आहे, हे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर १५१५६.२३ चौ.मी. क्षेत्रफळ विक्रीसाठी उपलब्ध होणार आहे. यातुन उर्वरित २३७४.९६ चौ.मी. अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास प्राप्त होणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील वणी, शिरपुर, पोलिस ठाण्याच्या हददीत अनेक अवैध धंदे सुरु असल्याबाबत.**

**(२८) ६८८३८ (३०-०८-२०२३). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील वणी, शिरपुर पोलीस ठाण्याच्या हददीत मोठया प्रमाणात मटका, जुगार अडडे व अवैध वाहतूक, गाडी लंपास इ. प्रकार होत असल्याची बाब माहे जुन, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या भागातील सुरु असलेल्या अनेक अवैध धंदयांना आळा बसण्यासाठी व या प्रकरणाकडे दुर्लक्ष करणा-या या संबंधीत अधिकारी व कर्मचा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) पोलीस विभागाकडे वेळोवेळी प्राप्त माहितीच्या आधारे खालीलप्रमाणे यवतमाळ जिल्हयातील पोलीस ठाणे वणी व शिरपुर च्या हददीत चोरुन अवैध मटका जुगार, अवैध दारु, अवैध वाहतूक व वाहन चोरी या गुन्ह्यांशी संबंधित माहे जुन २०२३ या कालावधीत कारवाई करण्यात आलेली आहे:-

| प्रकार | पोलीस ठाणे | एकूण केसेस | आरोपी संख्या | जप्त माल (रु.) |
|---|---|---|---|---|
| अवैध वरली, मटका व जुगार | वणी | २५ | ३५ | २७,६६० |
| | शिरपुर | १ | १ | ३१० |
| अवैध दारु | वणी | ७ | ७ | ५,१७,६४५ |
| | शिरपुर | ५ | ५ | १,९९५ |
| वाहन चोरी | वणी | ३ | २ | ३५,००० |
| | शिरपुर | ० | ० | ० |

लपुन छपुन चालणाऱ्या अवैध धदयांवर पोलीस विभागाकडून वेळीच छापे टाकुन कायदेशीर कार्यवाही करण्यात येत असून अवैध धंद्यांकडे दुर्लक्ष केल्याची बाब निदर्शनास आल्यास संबंधीत अधिकारी/ अंमलदार यांचेविरुध्द कायदेशिर कारवाई करण्यात येत असते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बाभुळगाव (जि.यवतमाळ) येथील १३२ के.व्ही.सबस्टेशन च्या कामा ला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२९) ६८८४९ (३०-०८-२०२३). डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाभुळगाव तालुक्यामध्ये यवतमाळ व धामनगाव येथून विघुत पुरवठा होत असल्याने एखादया ठिकाणी तार तुटल्यास पुर्ण तालुक्याची लाईन बंद होते असल्याने तालुक्यातील विघुत पुरवठा सुरळीत होण्यासाठी खडकसावंगा (ता.बाभुळगाव) येथे १३२ के.व्ही नवीन सबस्टेशन मंजूर करण्यात आले असल्याचे दिनांक १२ मे २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंजुर १३२ के.व्ही सब स्टेशन चे काम विघुत नियामक मंडळ कडे प्रलंबीत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय त्याअनुषंगाने मंजुर १३२ के.व्ही सबस्टेशनच्या कामा करिता निधी देवून काम पूर्ण करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
महापारेषणद्वारा मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगासमोर सादर केलेल्या बाभुळगाव उपकेंद्राच्या प्रस्तावासंदर्भात, मा.आयोगाद्वारे आर्थिक व तांत्रिक कारणांस्तव बाभुळगांव येथे १३२ के.व्ही. ऐवजी २२० के.व्ही. उपकेंद्र उभारणीबाबतची शक्यता पडताळून पाहण्याचे निर्देश दिलेले आहेत.

(३) मा. आयोगाने दिलेले निर्देश विचारात घेऊन सुयोग्य जमिनीची उपलब्धता, तांत्रिक सुसाध्यता अहवाल विचारात घेऊन पुढील कार्यवाही महापारेषण कंपनीद्वारे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील कन्हान नदीवरील कोच्छी बॅरेज प्रकल्पाचे सुधारित अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत**

**(३०) ६८९२३ (०३-०९-२०२३). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कन्हान (ता.सावनेर, जि.नागपूर) नदीवरील कोच्छी बॅरेज प्रकल्पास २००७-०८ मध्ये सूप्रमा देण्यात आले असून आजतागायत प्रकल्पातील बाधीत गावांचे पुनवर्सन अद्यापही पुर्ण झाले नसल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, या प्रकल्पाअंतर्गत येत असलेल्या बाधीत गावांतील प्रकल्पग्रस्तांना गावठाण्याच्या निवाडयाप्रमाणे सानुग्राह मिळत नाही, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, नागपूर जिल्हयातील सावनेर तालुक्यातील कन्हान नदीवरील कोच्छी बॅरेज प्रकल्पाच्या बांधकामास सन २००७-०८ मध्ये रु.२६२.२५ कोटीस मुळ सूप्रमा व सन २०१३-१४ मध्ये रु.९४७.२३८ कोटीस प्रथम सूप्रमा देण्यात आलेली आहे. पंरतु नवीन दरसुचीनुसार या प्रकल्पाच्या किमंतीमध्ये मोठया प्रमाणात वाढ झाल्याने या प्रकल्पाचे रु. १६६९.०० कोटीचे सुधारित अंदाजपत्रक तयार करून अंतिम मान्यतेसाठी सचिव जलसंपदा मंत्रालय मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, कन्हान नदीवरील कोच्छी बॅरेज प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण होण्यासाठी व सुधारित अंदाजपत्रकास निधीसह सूप्रमा मिळण्याबाबत तसेच प्रकल्पातील बाधीत गावांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे,
कन्हान नदी कोच्छी बॅरेज प्रकल्पांतर्गत एकूण ३ बाधित गावांचे पुनर्वसन करण्याचे प्रस्तावित आहे. त्यापैकी अ)बाधित गावठाण मौजा- कोच्छी चे पुनर्वसीत गावठाण कोच्छी बावनगाव येथील नागरी सुविधेची कामे पूर्ण झालेली असून जिल्हास्तरीय समितीने सुचविलेल्या अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून जिल्हा परिषद, नागपुर यांचे कडे सन २०२० ला हस्तांतरीत करण्यात आलेले आहे.
ब) बाधीत गावठाण मौजा-रायवाडी चे पुनर्वसीत गावठाण मौजा-बडेगाव येथील नागरी सुविधेची कामे ९० टक्के पुर्ण झाली असुन उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहे.
क) बाधीत गावठाण मौजा-ढालगाव खैरी चे पुनर्वसीत गावठाण पारडी (रिठी) येथील जमीन थेट खरेदी पद्धतीने भूसंपादन करण्याकरिता भूसंपादन कायदा २०१३ नुसार जमीनीचा निवाडा पद्धतीने भूसंपादन प्रस्ताव दि.२४/०५/२०२३ ला मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांना सादर केलेला आहे.
(२) अंशत: खरे आहे.
प्रकल्पांतर्गत बाधीत गावठाण मौजा- कोच्छी येथील खाजगी जमीनीवरील घरांना गावठाणातील निवाडयाप्रमाणे सानुग्रह अनुदान देण्याबाबतच्या प्रस्तावास नियामक मंडळाच्या बैठकीत मंजुरी प्राप्त झालेली असुन निधी मागणी प्रस्ताव महामंडळास सादर करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(३) व (४) अंशत: खरे आहे.
सन २०२२-२३ च्या दरसुचीनुसार प्रकल्पाचा रु.१४८४.९३ कोटीचा द्वितीय सुप्रमा प्रस्तावास राज्य तांत्रिक सल्लागार समितीच्या दि.१४.०३.२०२३ रोजीच्या बैठकीत मान्यता प्राप्त आहे. सुप्रमा प्रस्ताव नियामक मंडळाच्या पुढील

मंजुरीस्तव बैठकीत सादर करण्यात येत आहे. प्रकल्पातील बाधीत गावांचे पुनर्वसन करण्याबाबत कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न  उद्भवत नाही.

---

**कारंजा (जि. वाशिम) येथे गुटख्याचे अवैध धंदे सुरु असल्याबाबत**

**(३१) ६८९२८ (०३-०९-२०२३). श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कारंजा (जि. वाशिम) येथे गुटख्याचे अवैध धंदे सुरु असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी जिल्हा पोलीस प्रशासन व राज्य शासनाच्या गृह विभागाकडे माहे मे,२०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक व बीट जमादार हे मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार करीत असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी जिल्हा प्रशासन व राज्य शासनाकडे केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडून करण्यात आली अथवा येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२३) :**(१) कारंजा, जि. वाशिम येथील सावरकर चौक येथील पान टपरीवर दारू व अवैध गुटखा विक्री होत असल्याबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी, कारंजा, जि. वाशिम या कार्यालयात एक निनावी अर्ज प्राप्त झाला होता हे खरे आहे. मात्र गृह विभागाकडे असा अर्ज प्राप्त झालेला नाही.
(२) अशी तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी) कार्यालय आणि अभियंता कर्मचाऱ्यांच्या वसाहतीची झालेली दुरवस्था**

**(३२) ६९०२३ (०३-०९-२०२३). ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील दिंडोरी रोडवरील महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी) कार्यालय आणि अभियंता कर्मचाऱ्यांसाठी तब्बल ५० वर्षांपूर्वी १४८ हेक्टर वर कर्मचारी वसाहतीच्या तब्बल ६० इमारती निर्माण करण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील कर्मचारी वसाहतीतील ६० इमारती पैकी तब्बल ५६ इमारती ह्या जीर्ण होऊन धोकादायक स्वरूपाच्या झाल्या असल्याने भविष्यात इमारती कोसळून जिवितहानी होण्याची शक्यता निर्माण झाल्याने महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरीच्या) 'बांधकाम विभागाने' उपरोक्त ठिकाणी नवीन इमारत बांधकामाचा तसेच काही इमारीतींच्या देखभाल दुरुस्तीच्या कामासाठीचे प्रस्ताव सन २०१८ ते सन २०२३ पर्यत तब्बल ५ वेळेस जलसंपदा विभाग मुबई यांच्याकडे सादर केले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील इमारतींचे नव्याने बांधकाम करण्यासाठी व दुरुस्तीसाठी स्थानिक लोकप्रतिनिधीनी (नाशिक पूर्व) यांनी प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मुंबई यांना दिनांक ३ एप्रिल, २०२३ रोजी पत्राव्दारे कळवूनही कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी) कार्यालय आणि अभियंता कर्मचाऱ्यांच्या मोडकळीस व जीर्ण झालेल्या इमारत दुरुस्तीबाबत व नवीन कर्मचारी वसाहत इमारत निर्मिती बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०२३) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
मेरी संस्थेचे संपुर्ण क्षेत्रफळ १४८.५२ हे. आहे. या जागेत मेरी संस्थेंतर्गत असलेली कार्यालये, वसाहती व इतर शासकीय कार्यालये आहेत. तसेच अधिकारी/ कर्मचा-यांच्या निवासासाठी एकूण १३ प्रकारच्या ८१ इमारती सुमारे ५० वर्षापूर्वी निर्माण करण्यात आल्या.
(२) व (३) होय, अंशतः खरे आहे.
८१ इमारतींपैकी सद्यस्थितीत ४४ इमारती पूर्णपणे रिक्त आहेत. तथापि, अस्तित्वातील काही इमारतीं नादूरुस्त आहेत. मात्र त्या धोकादायक स्थितीत नसून इमारती कोसळून जीवीत हानी होण्याची शक्यता नाही. सदरील ठिकाणी मेरी संस्थेकडून नवीन इमारती बांधकाम सद्यस्थितीत प्रस्तावित नाही. मेरी संस्थेमार्फत काही इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठीचे प्रस्ताव सन २०१५ मध्ये तीन वेळा व सन २०१८ मध्ये एकदा शासनास प्राप्त झाले होते. सदरील प्रस्तावास पत्र क्र. संकीर्ण/२०१८/३०२/प्र.क्र.१२७/निवसं-३, दि.०७/०८/२०१८ अन्वये तत्वत: मान्यता दिलेली आहे. सन २०२२-२०२३ मध्ये रू.३३६.८४ लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला होता व सन २०२३-२०२४ मध्ये रू.१४३.६८ लक्ष निधीची तरतूद करण्यात आली असून आज अखेर रू.७१.८३ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे व दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर आहेत.
४ व ५. इमारती देखभाल दुरुस्तीबाबत उपलब्ध निधीतून कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच सद्यस्थितीत नवीन कर्मचारी वसाहत बांधणे प्रस्तावित नाही. त्यामुळे विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## दुधगंगा मोठा प्रकल्प, (ता. राधानगरी, जि. कोल्हापुर) दुधगंगा उजवा कालवा अंतर्गत कुर शाखा कालवा किमी १ ते १७ चे अस्तरीकरण करण्याबाबत

**(३३) ६९०६३ (०३-०९-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दुधगंगा मोठा प्रकल्प, (ता. राधानगरी, जि. कोल्हापुर) दुधगंगा उजवा कालवा अंतर्गत कुर शाखा कालवा किमी १ ते १७ चे अस्तरीकरण करणेचे काम प्रकल्पीय खर्चातुन करण्यासाठीचा प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत दि. १३ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास कार्यकारी अभियंता मकृखोविम, पुणे यांनी अमुस जलसंपदा विभाग यांना पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या मागणीनुसार अमुस यांनी प्रकल्पीय खर्चातुन काम करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या दि.१३/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कुर शाखा कालवा किमी १ ते १७ चे अस्तरीकरण करणेचे काम प्रकल्पीय खर्चातून करण्यासाठी मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला. सदर प्रकरणी शासन पत्र दि.२१/०७/२०२३ नुसार कुर शाखा कालवा किमी १ ते १७ च्या अस्तरीकरणाच्या कामाच्या आवश्यकतेबाबत तांत्रिक उहापोह करुन आगामी सुप्रमात समावेश करणेस मान्यता देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जैनपूर, घोगरगाव व बेलपांढरी (ता.नेसावी जि.छत्रपती संभाजीनगर) या तीन गावांच्या शेतीचे कापरी नैसर्गिक प्रवाहामुळे नुकसान झाल्याबाबत

**(३४) ६९०७९ (३१-०८-२०२३). श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जैनपूर, घोगरगाव व बेलपांढरी (ता. नेसावा अहमदनगर) या गोदावरी नदीकाठी असलेल्या तीन गावातील शेकडो एकर शेतीचे नुकसान सुमारे ८ कि.मी. लांबी असलेल्या कापरी नैसर्गिक प्रवाहामुळे (ओढा) होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कापरी नैसर्गिक प्रवाहाची खोलीकरण व रुंदीकरण करण्यासंदर्भात तत्कालीन जलसंपदा व जलसंधारण मंत्री यांच्या उपस्थितीत माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांना कापरी प्रवाहाच्या खोलीकरण व रुंदीकरणाच्या सूचना देऊन दीड वर्षाचा कालावधी उलटून गेला तरीही अद्याप सदर कामास सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी लोकप्रतिनिधींनी माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांची भेट घेऊन सदर काम तातडीने करण्यात यावे अशी मागणी केली असता, मा.मुख्यमंत्री महोदयांनी उक्त प्रवाहाचे खोलीकरण व रुंदीकरण तातडीने करण्याचे आदेश संबंधित अधिका-यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांच्या आदेशाच्या अनुषंगाने उपरोक्त कामास सुरुवात करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय राठोड (०३-११-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

गोदावरी नदी काठावरील मौजे-सुरगाव गंगा व बेलपांढरी, ता.नेवासा, जि.अहमदनगर या गावातील ५० शेतकऱ्यांची यादी व ६२.२३ हेक्टर क्षेत्र खराब झाले आहे, अशा आशयाचा ग्रामसभेचा ठराव प्राप्त झाला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५)

याबाबत, तत्कालीन मा.मंत्री (मृद व जलसंधारण) यांचेकडे दि.०३/१२/२०२१ तसेच मा.मुख्यमंत्री महोदयाकडे दि.१४/१०/२०२२ रोजी बैठका संपन्न झाल्या असून मा.मुख्यमंत्री यांच्याकडे झालेल्या बैठकीमध्ये सदर काम सुरु करण्याबाबत जलसंपदा विभागाच्या यांत्रिकी शाखेने यंत्र सामुग्री उपलब्ध करुन द्यावी व जिल्हा नियोजन आराखडयातून इंधनाचा खर्च भागवण्यात यावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार, प्राथमिक सर्वेक्षण करुन उपविभागीय जलसंधारण अधिकारी, नेवासा यांनी दि.२५/११/२०२२ रोजी मातीकामाचे परिमानाचे अंदाजपत्रक जिल्हा जलसंधारण अधिकारी अहमदनगर यांचेकडे सादर केले आहे. त्यास मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग यांचेकडून तांत्रिक मान्यता प्राप्त झालेली आहे. इंधनखर्च अदा करण्यासाठी लेखाशीर्ष उपलब्ध नसल्याने, जिल्हा वार्षीक योजना (सर्वसाधारण) सन २०२३-२४ च्या नावीन्यपूर्ण योजनांतर्गत, इंधनखर्च भागविण्यास एक वेळची विशेष बाब म्हणून शासन मान्यता देण्यात आली आहे. तद्नुषंगाने, जिल्हा नियोजन समिती कडून दि.१२/०८/२०२३ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यांत्रिकी विभागाकडून मशिनरी प्राप्त झाल्यानंतर तात्काळ काम सुरु होईल.

---

**मु. पो. ता. शिरोळ (जि. कोल्हापूर) तालुक्यात शासनाच्या जमिन सुधारण्याकरीता सुरू केलेल्या अनुदान योजनेअंतर्गत अनुदान मिळण्याबाबत**

**(३५) ६९२०१ (०३-०९-२०२३). श्री.राजेंद्र शामगोंडा पाटील (यड्रावकर) (शिरोळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु. पो. ता. शिरोळ (जि. कोल्हापूर) तालुक्यात क्षारपट जमिनीचे प्रमाण मोठया प्रमाणात असून शासनाच्या जमिन सुधारण्याकरीता सुरू केलेल्या अनुदान योजनेंतर्गत शिरोळ तालुक्यातील ज्या २७ गावांचा सर्व्हे शासनाने पूर्ण केला आहे त्या गावांना या योजनेचा लाभ तातडीने मिळावा अशी लेखी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.उपमुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ५ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, यापूर्वी खारवट व पाणथळ (क्षारपट) सुधारणा प्रकल्प योजना वाळवाच्या ५ गावांच्या पायलट प्रोजेक्ट नुसार शिरोळ तालुक्यातील ज्या २७ गावांचा सर्व्हे पूर्ण करण्यात आले आहे तेथे खारवट व पाणथळ सुधारणा प्रकल्प राबविण्यास कधी सुरूवात करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, शिरोळ तालुक्यातील ज्या २७ गावांचा सर्व्हे पूर्ण झाला आहे तेथे शासनाच्या क्षारपट जमिन सुधारणा योजने अंतर्गतच्या कार्यवाहीला सुरूवात करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०२३) :** (१) हे, खरे आहे.

(२) व (३)सांगली जिल्हयातील कवठेपिरान, उरुण-इस्लामपूर, आष्टा, कसबे डिग्रज व बोरगाव या ५ गावांतील क्षारपड खराब क्षेत्राची सुधारणा करणेसाठीच्या पथदर्शी प्रकल्पास रु.९३.७२ कोटी इतक्या रकमेस दि.२४.०१.२०२२ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. उपरोक्त ५ गावांतील पथदर्शी प्रकल्प हाती घेऊन Sub Surface Drainage Scheme च्या अनुषंगाने ५ गावांमध्ये पथदर्शी प्रकल्पावर येणा-या अनुभवाच्या आधारे राज्यव्यापी निकष ठरविण्याचे दृष्टीने शासन निर्णय दि.२५.०५.२०२२ अन्वये अभ्यासगटाची स्थापना करण्यात आली आहे. सद्यस्थितीत चर योजना मापदंड व कार्यपद्धती धोरण निश्चीत करणे शासनाचे विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौ.म्हसळा (ता. म्हसळा, जि.रायगड) येथील दीघी म्हसळा माणगांव डांबरीरस्त्यावर मोबाईल टॉवरसाठी केबल टाकण्याकरिता दिलेल्या परवानगीबाबत**

**(३६) ६९४०८ (२७-०९-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे म्हसळा ( ता.म्हसळा, जि. रायगड ) येथील दिघी-म्हसळा-माणगाव डांबरी रस्त्यावर मोबाईल टॉवर साठी ऑप्टीकल फायबर केबल ( O.F.C ) टाकण्यासाठी दिलेल्या परवांनगीचे उल्लंघन करून मे. टेलीसोनिक नेटवर्क लि. या कंपनीने सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांशी संगनमत करून भारतीय दंड संहिता चे कलम १२० ब, १६६, १६७, १६८, २६८, ३२३, ३३७, ३३८, ४२०, ४३५, ४६६, ४६२,व ४६७ अन्वये केलेल्या दाखलपात्र गुन्हासंबंधी एफ.आय.आर. दाखल करणे संदर्भात. अंजुम मेहमूद भांडविलकर, इमरान अब्दुल मजीद गजगे, शादाब शकील नजीर व अन्य ग्रामस्थांनी दि. २७ एप्रिल २०२३ रोजी पोलीस निरक्षक, म्हसळा पोलीस ठाणे, जि. रायगड तसेच जि. पोलीस अधिक्षक, रायगड-अलिबाग, यांच्या कडे एक सविस्तर निवेदन सादर केले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीस काय आढळून आले,त्याअनुषंगाने संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२३) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असता, असे निदर्शनास आले आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाने मे. टेलीसोनिक नेटवर्क लि. या कंपनीच्या दिघी-म्हसळा माणगाव रस्त्यावरून ओ.एफ.सी. केबल टाकण्यासाठी काही अटी व शर्तीच्या अधीन राहून परवानगी दिली आहे. सदर कंपनीने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आवश्यक अनामत रकमेचा भरणाही केलेला आहे.सदर काम सुरू असताना कोणतीही जीवित हानी व वित्त हानी झालेली नाही. ज्या ठिकाणी केबलचे काम सुरू असताना वाहतूक अडथळा होत आहे त्या ठिकाणी जेसीबी मशिनने साईड सोल्डर व्यवस्थित करून त्यावर पाणी मारून रोलरने दबाईचे काम आधीच सुरू करण्यात आले आहे. सद्यस्थितीत वाहतूकीस कोणताही अडथळा नसून रस्ता वाहतूकीस सुव्यवस्थित आहे असा अहवाल पोलीस अधिक्षक रायगड-अलीबाग यांनी शासनास सादर केला आहे. या प्रकरणात फसवणूक झालेली नसल्याने तसेच कोणीही दोषी आढळून आले नसल्याने कोणत्याही प्रकारची कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधूदुर्ग जिल्हातील प्रसिध्द आंबोली घाटात सातत्याने मृतदेह आढळून येत असल्याबाबत

**(३७) ६९४५६ (०१-०९-२०२३). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधूदुर्ग जिल्हातील प्रसिध्द आंबोली घाटात दि. २० जुन, २०२३ रोजी वा त्यासुमारास एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याचे निदर्शनास आले असून माहे मे, ते जुन २०२३ या महिन्यातील ही पाचवी घटना आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, आंबोली घाट हा मृतदेह फेकण्याचे ठिकाण बनत असल्याने घातपात संशय व्यक्त होऊन वर्षा पर्यटनाच्या आधी आंबोली घाटामध्ये मृतदेह मिळाल्याने स्थानिकामध्ये भीतीचं वातावरण निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२३) :**(१) होय, दिनांक २१.०६.२०२३ रोजी आंबोली घाटामध्ये एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढ़ळून आला आहे. या संदर्भात सावंतवाडी पोलीस स्टेशन येथे सी.आर.पी.सी. १७४ अन्वये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.
माहे मे २०२३ ते जून २०२३ या कालावधीमध्ये वरीलप्रमाणे अनोळखी मृतदेह सापडण्याबाबत एकाच घटनेची नोंद पोलीस विभागाकडे झाली आहे. सदर अकस्मात मृत्यूची चौकशी सुरू आहे.
(२) व (३) हे खरे नाही, आंबोली घाटामध्ये मृतदेह सापडण्याच्या एकमेव घटनेची नोंद झाली आहे. वर्षा पर्यटनाच्या कालावधीमध्ये आंबोली घाट परिसरात दिवसा व रात्री नियमीत गस्त घालण्यात येत असून सदर ठिकाणी अधिक पोलीस कुमक नेमण्यात येत असल्याने स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण असल्याबाबत पोलीसांकडे तक्रार प्राप्त नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### किकवी धरण प्रकल्प (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) येथील भूसंपादन करण्याबाबत

**(३८) ६९५८४ (०३-०९-२०२३). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किकवी धरण प्रकल्प (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) येथील भूसंपादनासाठी निधीची तरतूद करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उपमुख्यमंत्री यांना दि.२० जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने चौकशी करुन निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

सदर प्रकल्प हा मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या सिंचन अनुशेष निमुर्लन कार्यक्रमामध्ये समाविष्ट नाही, तथापि केंद्र शासनाच्या बळीराजा जलसंजीवनी योजनेत समाविष्ट आहे. केंद्र शासनाच्या बळीराजा जलसंजीवनी योजने अंतर्गत सदर प्रकल्पावर दि.०१/०४/२०१८ च्या उर्वरीत निधी रु.३२३.७५ कोटी करीता अर्थसहाय्य (केंद्र हिस्सा २५% व राज्य हिस्सा ७५% ) मंजूर आहे. काटीपाटी प्रकल्पासाठी बळीराजा जलसंजीवनी योजने अंतर्गत दि.३१.१०.२०२१ पर्यंत रु.२.५६ कोटी निधी खर्च करण्यात आला असून रु. ०.०११५ कोटी इतके केद्रिय अर्थसहाय्य प्राप्त झालेले आहे.

(२) होय.

याबाबत सद्यस्थितीस सन २०२२-२३ चे दरसूची नुसार अद्यावत सुधारीत प्रस्तावाबाबत रा.तां.स.स., नाशिक यांचे दि.०१/०२/२०२३ रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील उपस्थित मुद्द्यांबाबतची पूर्तता करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

### वेंगुर्ले (जि.सिंधुदुर्ग) तलाठी कार्यालयाच्या गोडाऊन मधील शासकीय कागदपत्रे चोरीला केल्याबाबत

**(३९) ६९५८७ (०१-०९-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेंगुर्ले (जि.सिंधुदुर्ग) तलाठी कार्यालयाच्या गोडाऊन मधील शासकीय कागदपत्रे चोरी करुन चक्क रद्दीत विकल्याचे माहे मे, २०२३ मध्ये उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी अज्ञात व्यक्तींवर वेंगुर्ला पोलीस ठाण्यात भादवी ३८० नुसार दि.०१ जून, २०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन १९५६ ते २०१६ पर्यंतच्या फाईल्स, कागदपत्रे, आकारबंद, आकारफोड पत्रक, वेंगुर्ले शहरातील नकाशे, गाव नमुना, महत्वाचे महसूली दप्तर तसेच सरकारी कामकाजाच्या इतर महत्वाच्या कागदपत्राचा समावेश चोरीला गेलेल्या कागदपत्रात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०२३) :** (१), (२), (३) व (४) होय, प्रस्तुत प्रकरणी पोलीस ठाणे, वेंगुर्ला येथे दिनांक ०१.०६.२०२३ रोजी गु.र.क्र. १०५/२०२३, भा.द.वि. कलम ३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील पोस्ट कार्यालयात ठेवीदारांच्या रक्कमेत अपहार झाल्याबाबत

**(४०) ६९६४३ (०१-०९-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील पोस्ट कार्यालयात ठेवीदारांची एकुण रक्कम व बनावट व्यवहार तफावत मिळून ३ लाख ७५ हजार रुपयांचा अपहार झाल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी संशयित ग्रामीण डाकसेवक सहाय्यक यांच्याविरुध्द ठेवीदारांची फसवणूक व डाक विभागात आर्थिक अपहार केल्याप्रकरणी डाक निरिक्षक यांनी कुडाळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अपहार व फसवणूकीची चौकशी करुन दोषी आढळून येणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०२३) :**(१) (२) व (३) होय, कुडाळ पोस्ट कार्यालय येथे रु. ३,७१,५६९/- इतक्या रकमेच्या झालेल्या अपहाराप्रकरणी डाक निरीक्षक, कुडाळ यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. १०.०६.२०२३ रोजी गु.र.क्र.१८७/२०२३, भा.दं.वि. कलम ४२०, ४१७, ४०९, ४६९, ४७१ आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(C), ६६(D) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## पुणे जिल्हयात आर्थिक गुन्हेगारीत वाढ झाल्याबाबत

**(४१) ६९६७६ (०१-०९-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयात माहे जानेवारी, २०२३ ते मे, २०२३ या चार महिन्यात १७८ आर्थिक गुन्हे घडल्याची नोंद असून एकुण ५८ कोटी रुपयांना फसवणूक झाल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन पुणे येथील किती आर्थिक गुन्हयांची उघड केली व किती जणांना अटक केले तसेच आर्थिक गुन्हे रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१२-२०२३) :** (१) पुणे शहर पोलीस आयुक्तालय व पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण यांच्या कार्यक्षेत्रात माहे जानेवारी २०२३ ते मे २०२३ या चार महिन्यात एकूण ६४५ आर्थिक गुन्हे घडल्याची नोंद असून फसवणूक झालेली रक्कम एकुण रु. १०२८.४९ कोटी असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) उपरोक्त नमूद आर्थिक गुन्ह्यांपैकी एकूण ४९७ आर्थिक गुन्हे उघडकीस आले आहेत. त्यामध्ये एकुण ३८२ आरोपींना अटक करण्यात आली असून ९७ गुन्ह्यांच्या अनुषंगाने मा. न्यायालयामध्ये दोषरोपपत्रे दाखल करण्यात आली आहेत.

आर्थिक गुन्हे रोखण्याबाबत पोलीस प्रशासनाकडून खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :-

१. पोलीस ठाणे हद्दीत आर्थिक गुन्हे घडू नयेत यास्तव जनजागृती करणेबाबत पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक यांचेकडून सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना सुचना देण्यात आल्या असून, आर्थिक गुन्ह्यांना प्रतिबंध व्हावा याकरिता पोलीसांकडून जनजागृतीचे काम करण्यात येत आहे.

२. नोकरी लावण्याच्या नावाखाली पैसे मागितल्यास किंवा इतर कोणत्याही प्रकारचे आमिष दाखवून पैसे मागत असल्यास त्याबाबत पोलीस ठाण्यात येऊन तक्रार देणेबाबत पोलीसांकडून नागरीकांना आवाहन करण्यात आले आहे.

३. आर्थिक व सायबर गुन्हे रोखण्यासाठी शाळा, कॉलेजमध्ये जनजागृती करण्यात येते. तसेच पोलीस पाटील मिटींग, दक्षता मिटींग घेऊन त्यांना आर्थिक व सायबर गुन्हे रोखण्यासाठी नागरीकांनी घ्यावयाच्या खबरदारीबाबत पोलीस स्टेशन स्तरावर जनजागृती करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नारवेल - बेनवले (ता.पेण, जि.रायगड.) येथील खारबंदिस्ताचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(४२) ६९७१० (०३-०९-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नारवेल - बेनवले (ता.पेण, जि.रायगड) येथे राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्प महाराष्ट्र जागतिक बँक सहाय्यता अंतर्गत खारबंदिस्तीसाठी जवळपास ६० कोटी रुपयाचा निधी शासनाने देऊनही खारेपाटातील नारवेल - बेनवले खारभूमी विकास योजनेचे विकास काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहिराम कोटक येथील खारबंदिस्तीला मोठ्या भेगा पडून त्याचा काही भाग खचून समुद्रात वाहून गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू खारबंदिस्तीचे काम अत्यंत निकृष्ट दर्ज्याचे झाल्याने भविष्यात स्थानिकांना मोठ्या संकटाला सामोरे जावे लागण्याची परिस्थिती निर्माण झाल्याने, अधिक्षक अभियंता, दक्षता पथक, मुंबई परिमंडळ, पाटबंधारे विभाग ठाणे यांची खारेपाट-विकास संकल्प संघटना व क्रांतीवीर संघटना यांनी भेट घेऊन ही बाब निर्दशनास आणून दिली असून देखील कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली तसेच नारवेल - बेनवले खारबंदिस्तीचे काम चांगल्या होण्याच्या दृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०२३) :**(१) खरे नाही.

(२) अंशतः खरे आहे.

नारवेल बेनवले खारभूमी योजना ता. पेण या योजनेच्या सा.क्र. १२९०० मी. (बहिरामकोटक) येथील बांध एकदम खाडीलगत आहे. समुद्राच्या ओहोटीवेळी पाण्यास मंथनगती प्राप्त होऊन बांधाच्या पायांमधील माती वाहून बांधाचा ३० मी. लांबीचा भाग खाडीमध्ये घसरला होता.

(३) खरे नाही.

सदर काम जागतिक बँक अर्थसहाय्यित राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण योजनेअंतर्गत सुरु असुन प्रकल्पाचे तृतीय पक्ष गुणवत्ता परिक्षण (TPQA) मार्फ़त वेळोवेळी गुणनियंत्रण तपासणी होत आहे. बांधाचा घसरलेला भाग तात्काळ दुरुस्त करण्यात आला असून स्थानिकांना कोणताही धोका नाही. दक्षता पथक. मुंबई परिमंडळ, पाटबंधारे विभाग ठाणे यांनी कार्यक्षेत्रावरील पाहणी करुन निरीक्षणे नोंदविली असुन त्यानुसार कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विश्रांतवाडी (जि.पुणे) येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण योजनेमध्ये पात्र लोकांना वगळून बाहेरच्या लोकांना घरे मंजूर केल्याबाबत

**(४३) ६९७४६ (०३-०९-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विश्रांतवाडी (जि.पुणे) येथील सर्व्हे नं. ४६ मधील झोपडपट्टीधारकांसाठी विकासकाने दुसऱ्या इमारतीमध्ये १५० फ्लॅट बांधल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू इमारतीमध्ये १०१ पात्र लाभार्थ्यांना घरे देण्यात येणार असून या यादीमध्ये कधीही वास्तव्यास नसलेल्या लोकांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण अधिकारी यांनी घरे व दुकाने मंजूर केल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण अधिकारी यांनी आर्थिक गैरव्यवहार करुन पात्र लोकांना वगळून बाहेरच्या लोकांना घरे मंजूर केले असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना घरे देण्याबाबत तसेच गैरव्यवहाराची चौकशी करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०६-११-२०२३) :** (१)होय, हे खरे आहे. सदर प्रकरणी झोपुप्रा, पुणे मार्फत सुधारीत बांधकाम परवानगी दिल्यानंतर विकासकाकडून बांधकाम पूर्ण झाल्यानंतर दिनांक ०८ फेब्रुवारी,२०२३ रोजी १५७ निवासी व ०९ बिगर निवासी पुनर्वसन सदनिकाकरिता अंतिम भोगवटा प्रमाणपत्र अदा करण्यात आले आहे.

(२) (३) व (४) हे खरे नाही, पात्रता यादी निश्चितीचे कामकाज पुणे महानगरपालिकेच्या सक्षम प्राधिकारी स्तरावर करण्यात आले आहे व त्या पात्रता यादीच्या आधारे प्राधिकरणाकडून दुसऱ्या फेजमधील पुनर्वसन सदनिका वाटप प्रक्रीया दि. ०९.०६.२०२३ रोजी पार पाडली आहे. त्याअनुषंगाने सद्यस्थितीत १०७ पात्र झोपडीधारकांपैकी १०१ पात्र निवासी झोपडीधारकांना लॉटरी पद्धतीने सदनिकांचे वाटप करण्यात आले आहे व विकासकांना यासंदर्भातील करारनामे निष्पादित करण्यासाठी सूचना दिल्या आहेत. मनपाच्या सक्षम अधिकाऱ्यांनी दि. ३१.०८.२००९ व दि. १७.०८.२०११ रोजी निर्धारित केलेल्या पात्रता यादीनुसार वाटप प्रक्रीया पार पाडली.

(५) प्रश्न उद्धभवत नाही.

---

## बोदवड उपसा सिंचन योजनेतील पंप हाऊसचे काम प्रलबित असल्याबाबत

**(४४) ७०१९० (०३-०९-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोदवड (जि. जळगांव) येथील उपसा सिंचन योजना शेतकऱ्यांच्या हिताचा प्रकल्प असून मुक्ताईनगर, बोदवड, भुसावळ, मलकापूर, मोताळा या पाच तालुक्यातील जवळपास ४२ हजार हेक्टर च्या वर भूक्षेत्र सिंचनाखाली येवून सदर परिसर सुजलाम् सुफलाम् करण्याचा शासनाचा मानस आहे. परंतु विविध सामाजिक संघटना तसेच शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतरही ठेकेदाराच्या निकृष्ट कामामुळे पंप हाऊसचे काम गेल्या चार वर्षांपासून प्रलंबित असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत तसेच पंप हाऊसचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.

बोदवड परिसर सिंचन योजना ता. बोदवड, जि. जळगांव अंतर्गत मुक्ताईनगर, बोदवड, जामनेर, मलकापूर व मोताळा या पाच तालुक्यातील ४२,४२० हेक्टर क्षेत्र सिंचित होणार आहे.

प्रकल्पाची सद्यस्थिती व नियोजन खालील प्रमाणे आहे:-

जुनोने धरणाचे बांधकाम ८०% पूर्ण असून, गाभा भराव - एकूण परिणाम १९९७७०९ घमीपैकी १५७७६८७ घ.मी. इतके (७९%) परिमाण पूर्ण आहे. कवच भराव एकूण परिमाण ७११०३१६ घमीपैकी ५६९६९८४ घ.मी. इतके (८०%) परिमाण पूर्ण आहे. सॅन्ड फिल्टर एकूण परिमाण १०७७६३ घमीपैकी ७१९६२ घ.मी. इतके (६७%) परिमाण पूर्ण आहे.

सदर धरणाचे पंप हाऊस क्र.१ चे काम ७०% पूर्ण आहे. तळाचा तलांक २००.५० मी., उच्च तलांक २३४.९५ मी., सद्यस्थितीत २२२.९५० मी. तलांकापर्यंत ६५% पूर्ण आहे. तसेच सदर धरणाचे पंप हाऊस क्र.२ चे काम ७५% पूर्ण आहे.

तळाचा तलांक २५२.५० मी., उच्च तलांक २६६.९५ मी., सद्यस्थितीत २६४.५० मी. तलांकापर्यंत ८६% पूर्ण आहे.

त्याचप्रमाणे रायझिंग मेन ११.८७ कि.मी. पैकी ५.३३ कि.मी. (४५%) पुर्ण आहे. उर्वरित कामे माहे डिसेंबर, २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथे मूत्रपिंड प्रत्यारोपण प्रकरणी गुन्हा दाखल झाल्याबाबत**

**(४५) ७०३०४ (२७-०९-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील कोरेगाव पार्क पोलीस ठाणे मध्ये एका महिलेने मूत्रपिंड प्रत्यारोपण झाल्यानंतर पैसे न मिळाल्याची तक्रार दाखल केली असल्याचे माहे एप्रिल २०२३ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, त्यानुसार सदर प्रकरणी शासनाकडून कोणत्या स्वरुपाची कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१२-२०२३) :** (१), (२) व (३) होय. सदर प्रकरणी अर्जदाराकडून प्राप्त झालेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने पोलीस विभागाकडून चौकशी करण्यात येऊन त्याबाबतचा अहवाल अधिक्षक, ससून हॉस्पीटल, पुणे यांना कायदेशीर कारवाई करण्याकरिता दिनांक ०१.०४.२०२२ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आला होता. सदर अहवालाच्या आधारे, डॉ. संजोग कदम, उप संचालक, आरोग्य सेवा मंडळ, पुणे यांनी दिनांक ११.०५.२०२२ रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन येथे भारतीय दंड विधान कलम ४२०,४६५,४६८,४७१,१२०(ब), ३४ व मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा, १९९४ चे कलम १०, १९ (अ) (ब) (क) व २० अन्वये गुन्हा क्रमांक ४६/२०२२ दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी दाखल गुन्ह्याचा तपास पूर्ण करुन गुन्ह्यातील एकूण १५ आरोपींपैकी २ आरोपींना अटक करून त्यांच्याविरुद्ध दि.११.०७.२०२३ रोजी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. सदर आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. उर्वरीत १३ आरोपींपैकी ५ आरोपींना मा. न्यायालयाने अटक पूर्व जामीन मंजूर केला असून १ आरोपीचा जामीन अर्ज मा. न्यायालयामध्ये प्रलंबीत आहे. याव्यतिरिक्त, ७ आरोपी हे रूबी हॉस्पीटल येथील डॉक्टर व स्टाफ असून त्यांच्याकडून आर्थिक देवाण घेवाण झाल्याचे उपसंचालक आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक यांच्या चौकशीमध्ये व पोलीस तपासामध्ये निष्पन्न न झाल्याने आणि त्यांच्याविरुद्ध दोषारोप पत्र पाठविण्याइतका सबळ पुरावा उपलब्ध नसल्याने दोषारोप पत्र पाठविण्यात आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील प्रलंबित धरणाबाबत

**(४६) ७०३१७ (०३-०९-२०२३). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुका सुजलाम, सुफलाम करण्यासाठी शासनाने तालुक्यातील नातूवाडी, पिंपळवाडी, न्यू मांडवे, शेलारवाडी, कोंडवली, पोयनार व तळवट या ८ धरणप्रकल्पांची कामे हाती घेवून कोटयवधी निधी खर्च करूनही धरणाची कामे अद्यापी अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खेड तालुक्यातील कोंडीवली येथे सन १९९७ मध्ये करोडो रूपयांचा निधी खर्च करून उभारण्यात आलेल्या धरणात मोठया प्रमाणात पाणीसाठा असताना मात्र गेल्या २२ वर्षात या धरणातील पाण्याचा सिंचनासाठी वापर करण्यात आलेला नसल्याने शेतकऱ्यांना या धरणातील पाण्याचा उपयोग करता आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, न्यू मांडवे धरणाची अवस्था अतिशय दयनीय असून या धरणाचे केवळ ३० ते ४० टक्के काम झाल्यानंतर धरणाचे काम बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेलारवाडी धरणामुळे अनेकांना आपली गावे सोडून अन्यत्र जावे लागले असल्याने धरणप्रकल्पांमुळे धरणाच्या खालील गावे ओलिताखाली येतील, शेतकऱ्यांना दुबार पीके घेता येणे शक्य होईल आणि आर्थिक सुबत्ता येईल परंतु धरण्याचे काम प्रलंबित असल्याने धरणातील पाणीही सिंचनासाठी शेतकऱ्यांना दुबार शेतीसाठी वापरण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, दुबी नदीवरील पिंपळवाडी धरणाचे काम गत ४७ वर्षापासून प्रलंबित असल्याने शेतकऱ्यांचेही मोठया प्रमाणात नुकसान होत आहे, हेही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदरहू धरणांची कामे मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असण्यामागील कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी करुन प्रलंबित धरण्याची कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील नातुवाडी मध्यम प्रकल्प, पिंपळवाडी लपा प्रकल्प, कोंडीवली लपा प्रकल्प पुर्ण झालेले असुन त्यामध्ये पाणीसाठा व सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे.

तसेच बांधकामाधीन प्रकल्पांपैकी शेलारवाडी व तळवट प्रकल्पांमध्ये पाणीसाठा निर्माण झाला असून न्यू मांडवे व पोयनार या प्रकल्पांची घळभरणी अद्याप व्हायची आहे. सदर ल. पा. प्रकल्पांवर मंजूर सुधारीत प्रशासकीय मान्यता पेक्षा जादा खर्च झाल्याने पुढील सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन कामे करणे नियोजित आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

कोडींवली ल. पा. प्रकल्प, ता.खेड अंतर्गत धरणाचे काम १९९५-९६ मध्ये पुर्ण होऊन पाणीसाठा निर्माण झाला आहे. तसेच ७.८ कि.मी लांबीचा उजवा कालवा व २.३ कि.मी लांबीचा डावा कालव्याचे बहुतांश माती काम व बांधकामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. तथापि शेतकऱ्यांकडून सिंचनासाठी पाणी सोडण्याची मागणी केली जात नसल्याने धरणातील पाण्याचा उपयोग होत नाही.

(३) होय, हे खरे आहे.

सन २००२ ते २००७ या काळात प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे धरणाचे काम बंद होते. तद्नंतर न्यू मांडवे या बांधकामाधीन लपा प्रकल्पांवर मंजूर सुधारीत प्रशासकीय मान्यतापेक्षा जादा खर्च झाल्याने सुधारीत प्रशासकीय मान्यता अभावी प्रकल्पाची कामे सद्य:स्थितीत बंद आहेत.

सद्य:स्थितीत सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर त्यास सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करुन उर्वरीत कामे निधी उपलब्धतेनुसार मार्च २०२६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) होय, हे खरे आहे.

शेलारवाडी प्रकल्पामध्ये पाणीसाठा निर्माण झाला आहे. तथापि प्रकल्पावर मंजूर सुप्रमापेक्षा जादा खर्च झाल्याने सुधारीत प्रशासकीय मान्यता अभावी प्रकल्पाची कामे बंद होती.

सद्य:स्थितीत शेलारवाडी ल.पा.योजनेला दिनांक २४/०७/२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार सुधारित प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. मंजूर सुधारित प्रशासकीय मान्यतेनुसार उर्वरीत कामे निधी उपलब्धतेनुसार मार्च २०२६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) होय, हे अंशत: खरे आहे.

डुबी नदीवरील पिंपळवाडी धरणाचे बांधकाम सन २००४ मध्ये पूर्ण झालेले असून धरणामध्ये पाणीसाठा निर्माण झालेला आहे. तसेच १४ कि.मी. लांबीचा उजवा मुख्य कालवा व त्यावरील ८ कि.मी. लाबीची वितरीका तसेच ९ कि.मी. लांबीचा डावा मुख्य कालवा व त्यावरील ११ कि.मी. लांबीची वितरीकांचे बहुतांश मातीकाम व त्या वरील बांधकामे सन २०१० मध्ये पूर्ण झाली आहेत. तथापि कालव्याची पाणी चाचणी घेतली असता कालव्याचे पाणी कालव्या लगतच्या घरात व शेतात गेल्यामुळे कालव्यामधून पाणी सोडण्यास विरोध झाल्याने कालव्यातून पाणी सोडण्यात येत नाही.

कालव्यामधून होणाऱ्या गळतीमुळे उघड्या कालव्या ऐवजी बंदिस्त कालव्याची मागणी लाभधारक शेतकरी करीत आहेत. त्यानुसार त्याबाबत तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता तपासून पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

(६) रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील नातुवाडी मध्यम प्रकल्प, पिंपळवाडी ल.पा. प्रकल्प, कोंडीवली ल.पा. प्रकल्प पुर्ण झालेले असून त्यामध्ये पाणीसाठा व सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे.

तसेच शेलारवाडी, तळवट, न्यू मांडवे व पोयनार या ल. पा. प्रकल्पांवर मंजूर सुधारीत प्रशासकीय मान्यतापेक्षा जादा खर्च झाल्याने सुधारीत प्रशासकीय मान्यता अभावी प्रकल्पांची कामे सद्य:स्थितीत मागील काही कालावधीपासून बंद आहेत.

सद्य:स्थितीत शेलारवाडी प्रकल्पाला दिनांक २४/०७/२०२३ रोजी सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून तळवट ल.पा.योजनेचा व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावावर नियोजन विभागाने उपस्थितीत केलेले मुद्दयांची पुर्तता करण्याची कार्यवाही सुरु आहे. न्यू मांडवे ल.पा.योजनेचा सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समिती (SLTAC) पुणे स्तरावर अंतिम झाला असून शासनास सादर करण्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. पोयनार ल.पा. योजनेच्या सुप्रमा प्रस्तावाची राज्य तांत्रिक सल्लागार समिती (SLTAC) पुणे येथे छाननी सुरु आहे.

तरी सर्व प्रकल्पांना सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करुन उर्वरीत कामे निधी उपलब्धतेनुसार मार्च २०२६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

सबब चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## असदपूर आणि शहापूर (ता. अचलपूर, जि.अमरावती) या गावांच्या पुनर्वसनाची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(४७) ७०३१९ (०४-०९-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रभागा बॅरेज लघुपाटबंधारे प्रकल्पामुळे बाधित असदपूर आणि शहापूर (ता. अचलपूर, जि.अमरावती) या दोन गावांचे पुनर्वसन झाले असून करण्यात आलेल्या मुलभूत सुविधाची कामे ४ वर्षाच्या कालावधीत पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जलसंपदा विभागाच्या अभियंत्यासमवेत दिनांक २३ जुन, २०२३ रोजी दिलेल्या प्रत्यक्ष भेटीमध्ये मुलभूत सुविधाची कामे निकृष्ट दर्जाची झाली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहापूर येथील पाण्याची टाकी अक्षरशः हलत असल्याचे गावकऱ्यांनी प्रत्यक्षदर्शी सांगितले असून पुनर्वसनातील सदर कामे या प्रकल्पावरील कार्यरत अभियंत्यांच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे निकृष्ट दर्जाची झाली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चंद्रभागा बॅरेज लघुपाटबंधारे प्रकल्पामुळे बाधित असदपूर आणि शहापूर (ता. अचलपूर) येथील पुनर्वसनातील मूलभूत सुविधेचे निकृष्ट दर्जाच्या झालेल्या कामाची सुधारणा करून कंत्राटदार आणि दोषी अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास. विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-१०-२०२३) :**(१) चंद्रभागा बॅरेज लघु प्रकल्पामुळे मौजे असदपुर व शहापुर या दोन गावांचे अंशत: पुनर्वसन झालेले आहे. सदरील पुनर्वसन मौजे असदपुर गावठाणांलगतच करण्यात आले आहे. मौजे असदपुर व मौजे शहापुर या दोन्ही पुनर्वसित गावठाणातील नागरी सुविधांची कामे फेब्रुवारी, २०१९ मध्ये सुरु होऊन मे, २०२२ ला पुर्ण करण्यात आलेली आहेत. सदर कामे ऑक्टोबर - २०२२ मध्ये जिल्हा परिषदेस हस्तांतरण करण्यात आलेली आहेत. दोन्ही पुनर्वसित गावठाणामधील पाणी पुरवठा योजनेची कामे महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, अमरावती विभागामार्फत सुरु आहेत.
(२) हे खरे आहे,
स्थानिक लोक प्रतिनिधी यांनी जलसंपदा विभागाच्या अभियत्यांसमवेत दि.२३ जून, २०२३ रोजी क्षेत्रीय स्थळी प्रत्यक्ष भेट दिली आहे. भेटी दरम्यान काही नागरी सुविधा इमारतींच्या भिंतीचे प्लास्टर निघाल्याचे तसेच शाळा इमारतींच्या शौचालयातील भिंतीस काही ठिकाणी तडे गेल्याचे तसेच शौचालयाची पाईपलाईन उखडल्याचे आढळून आले.
(३) हे खरे नाही,
शहापुर पुनर्वसन गावठाणातील नागरी सुविधा अंतर्गत पाण्याच्या टाकीसह पाणी पुरवठयाचे काम ठेव कामाअंतर्गत महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, अमरावतीमार्फत झालेले आहे. सदरील नागरी सुविधा अजुनही हस्तांतरीत झालेली नाही. तरी सदर काम पुर्ण करणेबाबत महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, अमरावती यांना क्षेत्रिय स्तरावरुन निर्देश देण्यात आलेले आहेत.
(४) नागरी सुविधाच्या कामांमध्ये कंत्राटदाराचा दोष दायित्व कालावधी ५ वर्षाचा असल्याने सदर कामाबाबत कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती यांचे पत्र क्र.२१५/अपाविअ /तां.१/चंद्रभागा बॅ./२०२३ दि.२७/६/२०२३ अन्वये मे. रिलायंट बिल्टअप, सांगली या कंत्राटदारास कळविले आहे. व सदर डागडुजीचे काम संतोष जनक करुन देण्याचे कंत्राटदाराने आश्वासन दिले आहे. तसेच, विभागाने कळविल्यानुसार सदर इमारतींमध्ये कोणताही मोठा Structural defect नसुन कोणत्याही इमारती आतल्या बाजुस गळत नाही व तसेच सदर नागरी सुविधा हस्तांतरणाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाने समिती गठण करुन समितीतील अध्यक्ष उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी अचलपुर, गट विकास अधिकारी, कार्यकारी अभियंता (ज.सं.) कार्यकारी अभियंता (सार्वजनिक बांधकाम) कार्यकारी अभियंता (जलविदयुत) कार्यकारी अभियंता (म.जि.प्रा), शिक्षणाधिकारी यांच्या समितीने सदर पुनर्वसन गावठाणास भेटी देवुन तसेच त्यांनी दिलेल्या सुचनांचे पालन करुन सदर नागरी सुविधा हस्तांतरण करणेत आलेल्या आहेत. तसेच मा.आमदारांच्या भेटीदरम्यान आढळुन आलेल्या दोषांचे निराकरण करुन सदर नागरी सुविधांची कामे सुयोग्यरित्या करुन देणे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव आणि बुलढाणा जिल्ह्यातील बोदवड सिंचन प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(४८) ७०३७४ (०४-०९-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव आणि बुलढाणा जिल्ह्यातील पाच तालुक्यांचा उपयुक्त ठरणाऱ्या बोदवड परिसर सिंचन योजनेमुळे बुलढाणा आणि जळगाव जिल्ह्यातील ५३ हजार ४४९ सिंचनाची सुविधा निर्माण करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बोदवड परिसर उपसा सिंचन योजनेच्या २१७ कोटी खर्चास मंत्रिमंडळात मान्यता देण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मलकापूर येथील सिंचनाचा अनुशेष असणाऱ्या वजीराबाद, जलालाबाद, देवधाबा, जांभुलधाबा, भालेगाव इत्यादी व अन्य २५ ते ३० खेडे बोदवड सिंचन प्रकल्पामध्ये समाविष्ट असून सदर प्रलंबित योजनेला गती

देण्याकरता उपाययोजना करण्यात याव्यात याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.उपमुख्यमंत्री यांना दिनांक १५ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन सिंचन प्रकल्पाच्या योजनेला गती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
बोदवड परिसर उपसा सिंचन योजनेच्या रु.३७६३.६० कोटी किमतीच्या तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता अहवालास तापी पाटबंधारे विकास महामंडळाच्या दि.२९.०३.२०२२ रोजीच्या बैठकीत मान्यता प्रदान केली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी जुनोने धरण व उपसा प्रणाली टप्पा-१ अंतर्गत मलकापूर तालुक्यातील १८ गावांना सिंचनाचा लाभ देणे प्रस्तावित आहे. त्यात जलालाबाद, देवधाबा व भालेगांव या गावांचा समावेश आहे. त्यानुसार टप्पा-१ अंतर्गत योजनेची कामे क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे. तसेच टप्पा-२ अंतर्गत मलकापूर तालुक्यातील ७ गावांना सिंचनाचा लाभ देणे प्रस्तावित आहे. त्यात जांभूळधाबा व वजिराबाद या गावांचा समावेश आाहे. या योजनेच्या टप्पा-१ व टप्पा-२ अंतर्गत मलकापूर तालुक्यातील एकूण २५ गावांचा समावेश असून, केवळ टप्पा-१ अंतर्गत कामे करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. या योजनेची टप्पा-२ अंतर्गत कामे करण्यासाठी तापी पाटबंधारे विकास महामंडळाच्या आागामी नियामक मंडळाच्या बैठकीत प्रस्तावित करणेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील काही शासकीय अधिकारी, व्यावसायिक, दलाल यांच्या घरी व कार्यालयावर प्राप्तीकर विभागाने टाकलेला छापा

**(४९) ७०५११ (०३-०९-२०२३). श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खाजगी कंपन्यांना विविध शासकीय योजने अंतर्गत जमिनी मिळवून देण्यापासून तेथील कामांबाबत सरकारची मंजूरी मिळवून देण्यासाठी राज्यातील काही शासकीय अधिकारी, व्यावसायिक / मध्यस्थांची टोळीचे रॅकेट कार्यरत असून दिनांक २३ सप्टेंबर, २०२१ रोजी प्राप्तीकर विभागामार्फत राज्यातील विविध व्यवसायीक आणि मध्यस्थांच्या घरी कार्यालयावर टाकण्यात आलेल्या छापेमारीत जवळपास १ हजार ५० कोटीचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे दिनांक १९ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात केंद्रीय यंत्रणेच्या शोध मोहिमे अंतर्गत केंद्रीय अर्थमंत्रालयाने ७ ऑक्टोबर २०२१ रोजी सदरहू प्रकार जाहीर केला असतानाही त्याअनुषंगाने राज्य शासनाने अद्याप कोणतीच कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची शासनाने गंभीर दखल घेऊन उच्चस्तरीय सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार रॅकेटमध्ये कार्यरत असलेले संबंधित शासकीय अधिकार, दलाल व संबंधित दोषींविरुद्ध कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही. राज्यातील कोणत्याही पोलीस स्टेशन मध्ये प्रश्नाधीन नमूद प्रकरणी तक्रार प्राप्त झालेली नाही अथवा गुन्हा दाखल करण्यात आला नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे येथे इंडसलँड बँकेत रक्कम भरणाकरित असतांना झालेली लुट

**(५०) ७०७६१ (०३-०९-२०२३). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंढवा (जि.पुणे) येथील इन्डसलँड बँकेमध्ये कॅश भरणा करत असतांना श्री.अक्षय आनंदराव गोटे यांची दि. ७ जुन २०२३ रोजी २ लक्ष रुपयांची आर्थिक लुट झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोटे यांनी कोंढवा पोलीस स्टेशन, पुणे येथे दि. ७ जून, २०२३ रोजी कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता अंतर्गत रीतसर तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाचा तपास अद्यापही प्रलंबित असून यामधील गुन्हेगार हा सराईत गुन्हेगार असून तो बँकेच्या व परिसरातील सीसीटीव्ही मध्ये स्पष्ट आढळून आला असून त्याने शहरातील अन्य बँकांमध्ये आर्थिक लुट केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर आरोपी वारंवार आर्थिक लुटीचे गंभीर गुन्हे करीत असतांना पोलिसांच्या अटकेत येत नसल्याचे ही निदर्शनास आल्याने शासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीचे स्वरूप काय आहे, वा त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२३) :**(१) व (२) होय.

(३) व (४) हे खरे नाही. सदर प्रकरणातील आरोपींविरुद्ध गु.र.क्र. ५७९/२०२३, भा.दं.वि. कलम ४०६, ४२० अन्वये दि. ०७.०६.२०२३ रोजी पोलीस ठाणे कोंढवा येथे गुन्हा दाखल केला आहे. तपासादरम्यान सदर गुन्हा नोंद होण्यापूर्वी आरोपीविरुद्ध लष्कर पोलीस ठाणे, कोरेगाव पोलीस ठाणे, खडक पोलीस ठाणे, डेक्कन पोलीस ठाणे तसेच, पनवेल, ठाणे, अहमदनगर, नाशिक, मुंबई, रतलाम (मध्यप्रदेश), कारंज (गुजरात) या ठिकाणी गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर आरोपीला दि. १५.०७.२०२३ रोजी येरवडा कारागृह येथून मा. न्यायालयाच्या प्रोड्युस वॉरंटवर पोलीसांनी ताब्यात घेतले असून दि. १८.०७.२०२३ रोजी आरोपीस न्यायालयीन कोठडी मंजूर झाली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.